नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in ✉ nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १४९ * ✽ अकोला ✽ | मंगळवार, दिनांक २ डिसेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## संसद परिसरात कुत्रा घेऊन पोहोचल्या रेणुका चौधरी

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली दि. १ :**
संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सोमवारी काँग्रेस खासदार रेणुका चौधरी आपला पाळीव कुत्रा घेऊन संसद परिसरात पोहोचल्या. या घटनेवर भाजप खासदारांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.
रेणुका चौधरी यांना विचारण्यात आले की, त्या कुत्र्याला संसदेत का घेऊन आल्या आहेत, तेव्हा त्या म्हणाल्या- सरकारला प्राणी आवडत नाहीत. यात काय अडचण आहे? त्या म्हणाल्या, हा लहान आणि अजिबात नुकसान न करणारा प्राणी आहे. संसदेत चावणारे दुसरेच आहेत, कुत्रे नाहीत.
त्यांच्या या कृतीवर भाजप खासदार जगदंबिका पाल यांनी नाराजी व्यक्त केली आणि म्हटले- रेणुका चौधरी कुत्रा घेऊन संसदेत आल्या, हे चुकीचे आहे. त्यांच्यावर कारवाई व्हायला पाहिजे.

अग्रलेख

खरीखरी...

## मराठी पंतप्रधान

मराठ्यांनी कोणे एकेकाळी म्हणजे छत्रपती संभाजी राजे यांच्या निधनानंतर भारतातील अनेक राज्यांवर मराठ्यांची सत्ता आणण्याचे महत्त्कार्य केलेले होते. गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, दक्षिण भारत, ओडीसा यासह अनेक राज्यांमध्ये मराठी भाषिक मराठे त्यावेळचे राज्यकर्ते होते. त्यावेळी जवळजवळ अर्धा भारत मराठ्यांच्या टाचेखाली होता मराठ्यांचे अधिपत्त्य एवढे मोठे होते की, मोगलांचे दिल्लीचे तख्त राखणारेही मराठेच होते. मराठी सत्तेचा हा महापराक्रम इतिहासामध्ये नमूद आहे. आधुनिक काळात त्याचे स्मरण होण्याचे कारण आज महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी लवकरच भारतात मराठी पंतप्रधान होऊ शकतो, असे जाहीर करून टाकलेले आहे. अटकेपार झेंडे रोवणाऱ्या मराठी मनाला हे विधान ऐकून निश्चितच परमानंद होईल यात अजिबात शंका नाही. लालबहादूर शास्त्री यांच्या निधनानंतर दिल्लीच्या दरबारातील काँग्रेसचे मोठे नेते यशवंतराव चव्हाण यांनी देशाचे नेतृत्व करावे असे काँग्रेस मधील देशभरातल्या तेव्हाच्या तरुण तुर्कांनी यशवंतरावांना सांगितले होते. यामुळेच तत्त्वनिष्ठ यशवंतराव चव्हाण भावनाभिमुख झाले होते असे म्हणतात. त्यांनी तेव्हाच्या तरुण आपल्या पक्षातील तरुण तुर्कांना आपली तत्त्वं पाळत स्पष्टपणे सांगितले की पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मला दिल्लीला बोलावले होते. आता त्यांच्या कन्येला म्हणजेच इंदिरा गांधी यांना ही बाब मी सांगेन. त्यांनी मान्य केल्यानंतरच मी याबाबतचा निर्णय घेऊ शकतो. या घटनेच्या नंतरचा इतिहास सर्वांनाच ठाऊक आहे, लगेचच इंदिरा गांधी यांना पंतप्रधान करण्यात आले होते. भारताच्या पंतप्रधान पदावर बसण्याचा मराठी माणसाचा योग तेव्हा दिल्लीच्या वतुर्ळातील एक मराठी माणूस असलेल्या यशवंतराव चव्हाण यांच्या तत्त्व निष्ठेमुळे तो जमू शकला नाही. पृथ्वीराज चव्हाण यांनी आत्ताच असे विधान करण्याचे नेमके कारण काय त्याचा शोध आपण घेतला पाहिजे. जगातील अनेक देशात सत्तांतरे घडवण्याचे सत्कर्म म्हणा किंवा दुष्कर्म म्हणा, हे काम अमेरिकेने अनेकवेळा केले आहे. सध्या एफस्टाईन फाईल्स वरून अमेरिकेत गेल्या पाच ते सहा महिन्यापासून मोठा गोंधळ सुरू आहे. ही फाईल उघड झाल्यावर भारताच्या राजकारणावर त्याचा परिणाम अगदी उलट होऊ शकतो आणि त्यामुळेच काही दिवसात मराठी माणूस देशाचा पंतप्रधान होऊ शकतो असे वक्तव्य पृथ्वीराज चव्हाण यांनी केले. अमेरिकेतील फार मोठा उद्योगपती जेफ्री अमस्टिन याने अमेरिकेतील अनेक लॉबीइस्ट लोकांना भेटून फार मोठ्या कारवाया केलेल्या आहेत. यामध्ये अमेरिकेतील ब ?याच मोठमोठ्या नेत्यांची नावे त्यामध्ये गुंतलेली आहेत, त्यामध्ये ट्रम्प यांचे नाव सुद्धा अग्रक्रमावर आहे. अमेरिकेची पूर्ण संसद त्यांच्या मागे लागूनही ती नावे ट्रम्प खुली करत नाही जर असेच होत राहिले तर संसदेला ती कागदपत्रे खुली करण्याचा अधिकार मिळतो. संसदीय लोकशाही आणि अध्यक्षीय लोकशाही याच्यामध्ये काही अतिशय पातळ सीमारेषा आहेत. अमेरिकन संसद जेव्हा हा वापर करेल तेव्हा मोठा धमाका होण्याची शक्यता आहे. एखादी मोठी घटना जगावर दादागिरी करणा ?या देशामध्ये घडली तर त्याचे परिणाम संपूर्ण विश्वभर पसरतात, याबद्दल कोणाच्याच मनात दुमत नसावे. याच सूत्रानुसार माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी हे गृहीतक मांडलेले आहे. मग आता तो मराठी माणूस कोण, सध्या तो कोणत्या पदावर आहे. याचा जुना भूतकाळ कसा होता आणि आगामी भविष्यकाळ कसा राहील याची देशभरात चर्चा सुरू झालेली आहे. आपल्या राष्ट्रगीतातील पंजाब, सिंध, गुजरात, मराठा यामधील या देशातला मराठा म्हणजेच आपला मराठी माणूस देशभरात विखुरलेला आहे पण, हा मराठी माणूस ज्या ज्या राज्यात आहे त्याच्या राज्यात फक्त प्रवासी म्हणून तो राहिलेला नाही तर तो निवासी म्हणून राहिलेला आहे. यामुळेच ग्वाल्हेरच्या शिंदेंचे सिंदीया झाले, इंदूरचे होळकर होळकर आहेतच. बडोद्याचे गायकवाड तर गायकवाड राहिले. झाशीची राणी म्हणजेच नेवाळकर ही सुद्धा मराठीच होती. इतर अनेक संस्थाने आम्ही वर म्हटल्याप्रमाणे मराठ्यांची होती. अशा संस्थानिकांपैकी एखादा मराठी संस्थानिक कधीही पंतप्रधान पदावर पोहोचू शकतो. किंवा एखादा नवा संस्थानिक सुद्धा निर्माण होऊ शकतो. यामुळे मराठी मनाला आनंद देणा ?या मराठी पंतप्रधान पदाचा विचारच मराठी माणसाला सुखावून जाईल यात वादच नाही. तो भाग्यशाली मराठी माणूस कोण हे आपण न ठरवता जनतेलाच ठरवू द्यावे, इतकीच आमची विनंती आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# निवडणुका पुढे ढकलल्यावरून आयोगावर आरोपाच्या फैरी

### विरोधकांसह मुख्यमंत्र्यांनीही केला घेतला समाचार : भाजपाचे आयोगाला पत्र

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**
नगर परिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील झालेल्या प्रकरणांसंदर्भात 23 नोव्हेंबर 2025 किंवा त्यानंतर निर्णय आलेल्या 24 अध्यक्षपदांच्या आणि विविध ठिकाणच्या 154 सदस्य पदाच्या जागांवरील निवडणुकांची प्रक्रिया अपील कालावधीनंतरच्या पुढील टप्प्यापासून सुधारित कार्यक्रमानुसार राबवली जाईल, त्यासाठी 20 डिसेंबर 2025 रोजी मतदान होणार आहे. उर्वरित अन्य सर्व ठिकाणी नियोजित निवडणूक कार्यक्रमानुसार 2 डिसेंबर 2025 रोजी मतदान होईल.



दरम्यान, ऐनवेळी निवडणूक आयोगाने काही ठिकाणच्या निवडणुका पुढे ढकलल्याने विरोधी पक्षांसह खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. भाजपाने यासंदर्भात निवडणूक आयोगाला एक पत्रही लिहिले आहे.
राज्य निवडणूक आयोगाने 4 नोव्हेंबर 2025 रोजी राज्यातील 246 नगरपरिषदा आणि 42 नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. आता निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील असलेल्या प्रकरणांचा निर्णय 23 नोव्हेंबर 2025 रोजी किंवा त्यानंतर आल्याने संबंधित ठिकाणी सुधारित कार्यक्रमाप्रमाणे निवडणूक प्रक्रिया राबवण्यात येणार आहे.

अध्यक्षपदासंदर्भातील अपिलांचा निकाल उशिरा आलेल्या नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या संपूर्ण क्षेत्रासाठी निवडणूक प्रक्रिया सुधारीत कार्यक्रमानुसार राबविली जाईल. अध्यक्षपदासोबतच सदस्यपदांची एकत्रित निवडणूक घेण्याची कायद्यात तरतूद आहे. ज्या ठिकाणच्या सदस्यपदासाठी अपील होते, तिथे मात्र फक्त त्या जागेपुरताच सुधारित निवडणूक कार्यक्रम राबविला जाईल.

अपील कालावधीनंतरच्या टप्प्यांसाठीच्या सुधारित कार्यक्रमानुसार आता 10 डिसेंबर 2025 रोजी दुपारी 3 वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र मागे घेता येतील. अंतिमरीत्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी आणि निवडणूक चिन्हांचे वाटप 11 डिसेंबर 2025 रोजी होईल. 20 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत मतदान होईल. मतमोजणी 21 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 10 वाजता सुरू होईल.

अध्यक्षपदांसह सर्व सदस्यपदांसाठी सुधारित कार्यक्रमानुसार निवडणूक होत असलेल्या 24 नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये ठाणे- अंबरनाथ. अहिल्यानगर- कोपरगाव, देवळालीप्रवरा, पाथर्डी व नेवासा. पुणे- बारामती व फुरसुंगी- उरुळी देवाची. सोलापूर- अनगर व मंगळवेढा. सातारा- महाबळेश्वर व फलटण. छत्रपती संभाजीनगर- फुलंब्री. नांदेड- मुखेड व धमार्बाद. लातूर- निलंगा व रेणापूर. हिंगोली- बसमत. अमरावती- अनंजनगाव सूर्जी. अकोला- बाळापूर. यवतमाळ- यवतमाळ. वाशीम- वाशीम. बुलढाणा- देऊळगावराजा. वर्धा- देवळी. चंद्रपूर- घुग्घूस यांचा समावेश आहे.

दरम्यान, या नव्या निर्णयामुळे तीव्र संताप पसरला असून, निवडणूक आयोगावर आरोपांच्या फैरी झडत आहेत.

## देशात राजकीय भूकंप?

### महिनाभरात मराठी माणूस पंतप्रधानपदी दिसू शकेल : चव्हाणांचे वक्तव्य

■ **वृत्तसंस्था, सातारा, दि. १ :**
"अमेरिकेत सध्या गाजत असलेल्या 'एपस्टाईन फाईल्स'ची माहिती बाहेर आल्यास भारताच्या राजकारणात मोठा भूकंप होऊ शकतो. या राजकीय उलथापालथीत कदाचित येत्या महिनाभरात एखादा मराठी माणूस देशाचा पंतप्रधान झालेला पाहायला मिळेल," असे सूचक आणि खळबळजनक विधान राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केले आहे.



त्यांच्या या विधानामुळे आणि सोशल मीडियावरील एका ट्विटमुळे दिल्लीपासून गल्लीपर्यंत चर्चांना उधाण आले आहे. सोमवारी कराड येथील निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

चव्हाण म्हणाले की, हा विषय आंतरराष्ट्रीय स्तरावरचा आहे. अमेरिकेत मोठा उद्योगपती. जेफ्री ॲमस्टिन त्याचे नाव आहे. त्या माणसाबद्दलचा हा विषय आहे. त्याने कायदा मोडला. त्याने खूप बेकायदेशीर कारवाया केल्या. त्यात सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांना गुंतवायचे आणि भानगडी करायला लावायच्या असा तो विषय आहे. सर्व मोठ्या राजकीय नेत्यांची नावे अमेरिकेत आली आहेत. त्यात राष्ट्रपती ट्रम्प यांचे देखील नाव आहे. त्यामुळे कदाचित ट्रम्प यांना राजीनामा द्यावा लागेल. तिकडे निवडणूक आयोगाचे फार कडक निकष आहेत. ट्रम्प यांनी राजीनामा देणे हा त्यांचा विषय आहे.

पृथ्वीराज चव्हाण पुढे म्हणाले, अमेरिकेची संसद ट्रम्प यांच्या मागे लागली आहे. नावे खुले करण्यास सांगत आहे. पण ट्रम्प करत नाहीत. कारण अनेक लोक अडचणीत येणार आहेत. संसद ट्रम्प यांच्या पाठिमागे सहा महिन्यापासून लागली आहे. 10 हजार कागदपत्रे संसदेने ताब्यात घेतले आहेत. संसद ही कागदपत्रे उघड करू शकते.

दरम्यान, ज्येष्ठ नेते सुब्रमण्यम स्वामी यांनी एक व्हिडिओ केला आहे. त्या व्हिडिओमध्ये देखील ती कागदपत्रे लवकरच मला मिळतील असे त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे राजकीय क्षेत्रामध्ये उलतापालथी होण्याची शक्यता आहे, असे मत चव्हाण यांनी व्यक्त केले.

या विषयासंदर्भात सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये पृथ्वीराज चव्हाण यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना टॅग केले आहे. त्यामुळे "नेमका कोणता मराठी माणूस पंतप्रधान होऊ शकतो?" असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता, "ते आता तुम्हीच शोधा," असे मिश्किल उत्तर देत चव्हाण यांनी सस्पेन्स कायम ठेवला.

**निवडणूक आयोगाचा 'पोरखेळ'**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील गोंधळावरून चव्हाण यांनी निवडणूक आयोगावर ताशेरे ओढले. "निवडणूक आयोगाने सगळा गोंधळ घालून ठेवला आहेख असे ते म्हणाले.

## कायदेशीर पेच टाळण्यासाठी घेतला निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**
2 डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदानाची सर्व तयारी पूर्ण झाली असतानाच, राज्य निवडणूक आयोगाने ऐनवेळी राज्यातील 24 नगरपालिका आणि 150 सदस्यांच्या निवडणुका पुढे ढकलल्याने एकच गदारोळ उडाला आहे.

### निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

मात्र, हा निर्णय का घेतला? याबाबत आता निवडणूक आयोगाने अत्यंत महत्त्वाचे स्पष्टीकरण दिले आहे. "जर निवडणुका पुढे ढकलल्या नसत्या, तर कायदेशीर बाबींमुळे भविष्यात संपूर्ण निवडणूक प्रक्रियाच रद्द होण्याची भीती होती. हा धोका टाळण्यासाठीच कायदेशीर सल्ला घेऊन हा निर्णय घेणे अपरिहार्य होते," असे आयोगाने म्हटले आहे.

## शक्तिपीठवरून नवा संघर्ष

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १ :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच झालेल्या चंदगड येथील सभेत जनतेच्या मागणीनुसार महामार्गाचा मार्ग चंदगडमधून वळवण्यात आल्याचे सांगितले. या महामार्गामुळे परिसराचा विकास होईल, रोजगारनिर्मिती होईल आणि उद्योग येतील, असा दावा त्यांनी केला.



मात्र या घोषणेनंतर लगेचच शक्तिपीठ विरोधी संघर्ष समितीने निषेध नोंदवला. समितीचे राज्य समन्वयक गिरीश फोंडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट इशारा दिला की सरकारने शक्तिपीठ महामार्गाचा हट्ट सोडला नाही, तर शेतकरी पुन्हा तीव्र आंदोलन छेडतील. आम्ही हा महामार्ग होवू देणार नाही. या इशाऱ्यामुळे शक्तिपीठ विरोधात नवा संघर्ष उभा राहण्याचे संकेत दिसत आहेत.






## आता प्रत्येक मोबाईलमध्ये असेल सायबर सिक्युरिटी ॲप

### सरकारने कंपन्यांना दिली ९० दिवसांची मुदत

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली दि. १ :**
आता प्रत्येक नवीन स्मार्टफोनमध्ये 'संचार साथी' हे सायबर सिक्युरिटी ॲप प्री-इन्स्टॉल (आधीपासून डाउनलोड केलेले) मिळेल. केंद्र सरकारने स्मार्टफोन कंपन्यांना आदेश दिला आहे की, त्यांनी स्मार्टफोनमध्ये सरकारी सायबर सेफ्टी ॲप आधीपासून इन्स्टॉल करून विकावे.




न्यूज एजन्सी रॉयटर्सनुसार, हा आदेश आज समोर आला आहे. यामध्ये ॲपल, सॅमसंग, विवो, ओप्पो आणि शाओमीसारख्या मोबाईल कंपन्यांना 90 दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे.

हे ॲप वापरकर्ते डिलीट किंवा डिसेबल करू शकणार नाहीत. जुन्या फोनवर सॉफ्टवेअर अपडेटद्वारे हे ॲप इन्स्टॉल केले जाईल.

तथापि, हा आदेश सध्या सार्वजनिक करण्यात आलेला नाही, तर निवडक कंपन्यांना खासगीरित्या पाठवण्यात आला आहे. याचा उद्देश सायबर फसवणूक, बनावट क्टएक नंबर आणि फोन चोरी रोखणे हा आहे.




# निवडणुका रद्द करणे चुकीचे

## निवडणूक आयोगावर मुख्यमंत्री फडणवीसांचा वार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :
कोणी सत्तेत आहे, कोणी सत्तेबाहेर आहे यावरुन रेड ठरत नाही. एखादी तक्रार आली, आमच्या कार्यकर्त्या संदर्भात तक्रार आली तरी कारवाई होते. अनेक वेळ माझी देखील गाडी तपासली जाते. सत्ताधारी, विरोधक अशा कुठल्या गोष्टी यामध्ये नसतातह्व असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

काही निवडणुका अचानक रद्द करण्यात आल्या आहेत. उद्या मतदान आणि काल निवडणुका रद्द झाल्या. त्यामुळे कार्यकर्ते निराश झाले, यावर देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आलं. निवडणूक आयोगाने कायद्याचा चुकीचा अर्थ लावला आहे. या निवडणुका रद्द करणं अत्यंत चुकीच आहे. अशा पद्धतीने कोणीतरी कोर्टात जाईल आणि निवडणूक पुढे ढकलली जाईल असं आजपर्यंत कधी झालं नव्हतं असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

निवडणूक आयोग कुठला कायदा काढतय, कोणाचा सल्ला घेते मला माहित नाही. जेवढा माझा कायद्याचा अभ्यास आहे, मी अनेक वकिलांशी बोललो, अशा पद्धतीने निवडणुका एखादा व्यक्ती कोर्टात गेला म्हणून पुढे ढकलता येत नाहीत, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

निलंग्याच उदहारण घ्या, मी संभाजी पाटील निलंगेकर यांच्याशी बोललो. सर्व प्रक्रिया पूर्ण झालेली. कोणा एकाचा फॉर्म रद्द झाला, तो कोर्टात गेला. कोटाने त्याचा फॉर्म रिजेक्ट केला. ज्यांनी फॉर्म भरला त्यांना प्रचाराला पूर्ण वेळ मिळाला. कोणातरी पार्टी केलं होतं, म्हणून निवडणूक पुढे ढकलणं चुकीचं आहे. अर्थात निवडणूक आयोग स्वायत्त आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.



निवडणूक घेण्याचा त्यांना अधिकार आहे. कायदेशीररित्या निवडणूक आयोगाने निवडणुका पुढे ढकलण चुकीच आहे. ज्या उमेदवारांनी प्रामाणिकपणे गोष्टी केल्या. ज्या कार्यकर्त्यांनी मेहनत केली त्यांच्यासाठी हे अत्यंत चुकीच आहे. आम्ही या संदर्भात निवडणूक आयोगाला एक रिप्रेझेंटेशन देऊ असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

निवडणुका पुढे ढकलणं चुकीच होतं, नगरविकास विभागाचा यात संबंध नाहीय. हा निवडणूक आयोगाचा निर्णय आहे. कलेक्टर्सनी त्यांचं मत मांडलं. त्यांनी घेतलेला निर्णय तो मान्य करावा लागेल पण तो निर्णय चुकीचा आहे असं फडणवीस म्हणाले. भाजपने एक सर्वे केला, त्यानुसार 75 नगराध्यक्ष निवडून येतील असा प्रश्न एका पत्रकाराने विचारलं. त्यावर फडणवीस यांनी ह्वअसा काही सर्वे झाल्याचं आपल्याला माहित नाही. पण भाजप नंबर 1 चा पक्ष आहे. आमचे मित्र पक्ष त्या खालोखाल राहतील, असेही ते म्हणाले.

## शहर कार्याध्यक्ष पदाचा रूपाली ठोंबरेंचा राजीनामा



■ **पुणे :** सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजी आणि पदोपदी होणाऱ्या अपमानामुळे नाराज असलेल्या पुण्याच्या आक्रमक नेत्या रूपाली ठोंबरे पाटील यांनी अखेर पक्षाच्या शहर कार्याध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे.

त्यांनी आपला राजीनामा थेट पक्षश्रेष्ठी अजित पवार यांच्याकडे सुपूर्द केला आहे. दोन दिवसांपूर्वीच त्यांनी हा राजीनामा पक्षश्रेष्ठींकडे सोपवला असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, पक्षाने अद्याप त्यांचा राजीनामा मंजूर केलेला नाही. अजित पवार यांच्यासोबत होणाऱ्या अंतिम बैठकीनंतर आपण पक्षातून बाहेर पडण्याबाबतचा अंतिम निर्णय जाहीर करू, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

काही दिवसांपूर्वीच रूपाली पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांची मुंबईत भेट घेतली होती. या भेटीवेळी त्यांच्यासोबत काँग्रेसच्या संगीता तिवारी आणि शिंदे गटाच्या शर्मिष्ठा येवले उपस्थित होत्या. तेव्हा "ही भेट राजकीय नाही," असे सांगितले होते. मात्र, आता पदाचा राजीनामा दिल्याने त्या लवकरच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे जवळपास निश्चित मानले जात आहे. त्यामुळे रूपाली पाटलांच्या या निर्णयामुळे ऐन निवडणुकीच्या तोंडावर पुण्यात अजित पवार गटाला मोठे खिंडार पडण्याची शक्यता आहे.

श्रीकांत शिंदे यांच्या भेटीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना रूपाली ठोंबरे यांनी पक्षांतराचे संकेत दिले होते. "श्रीकांत शिंदे यांची खासदार निधीच्या कामासंदर्भात भेट घेतली होती. कोणत्या पक्षात काम करायचे आणि कोणता नेता आपल्याला पाठिंबा देतोय, हे पाहण्याचा अधिकार कार्यकर्त्याला आहे. माझे प्रवक्तेपद गेले म्हणून मी काम करणे थांबवलेले नाही. महिलांचा आणि कार्यकर्त्यांचा सन्मान होत असेल, तर मी नक्कीच विचार करेन, असे रूपाली पाटील ठोंबरे यांनी म्हटले होते.

## नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराच्या घरावर हल्ला



■ **सांगली :** जिल्ह्यातील जत नगरपरिषदेत मतदानाच्या एक दिवस अगोदर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस काँग्रेसच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराच्या घरावर हल्ला करण्यात आला आहे. राष्ट्रवादीने या प्रकरणी थेट आपला मित्रपक्ष भाजपला जबाबदार धरले आहे. यामुळे येथील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसने जत नगरपरिषदेच्या निडवणुकीत सुरेश शिंदे यांना नगराध्यक्षपदाची उमेदवारी दिली आहे. आज पहाटे काही अज्ञात हल्लेखोरांनी सुरेश शिंदे यांच्या घरावर व गाडीवर दगडफेक करण्यात आली. त्यात सुदैवाने कुणीही जखमी जाले नाही. पण शिंदे यांच्या गाडीचे व घराचे मोठे नुकसान झाले. नगरपरिषदेसाठी उद्या मतदान होणार असताना आपल्या उमेदवाराच्या घरावर हा हल्ला झाल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसने तीव्र संताप व्यक्त केला आहे.

विशेषतः राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांत संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणी दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते समोरासमोर येण्याची भीती असल्यामुळे शहरात तणावपूर्ण शांतता आहे. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादीचे माजी आमदार विलास जगताप यांनी या घटनेसाठी भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांना जबाबदार धरले आहे. हा हल्ला भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांनी केला. निवडणुकीतील पराभवाड्या भीतीने त्यांनी असा भ्याड हल्ला केला, असे ते म्हणाले.

## एकनाथ शिंदे यांचे ३५ आमदार फुटणार

### संजय राऊत यांचा नवा बॉम्ब



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १ :
राज्यातं निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच महायुतीत पक्ष वाढीवरून वाद उफळल्याचे दिसून आले. मला 2 तारखेपर्यंत युती टिकवायची आहे, असे वक्तव्य करून भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी महायुतीत काहीच आलबेल नसल्याचे सूतोवाच केले होते.

महायुतीमधील वादांवर आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाष्य केलं आहे. शिंदे सेनेचा कोळथा हे दिल्लीचे अमित शहा काढणार असे म्हणतच शिंदेंचे 35 आमदार फुटणार. रविंद्र चव्हाण हे डोंबिवलीचे आहेत, प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती यासाठी करण्यात आली आहे, असा दावाही त्यांनी केला.

आजारपणामुळे राऊत हे महिनाभर राजकारणात सक्रीय नव्हते, आता उपचारानंतर आज ते माध्यमांसमोर आले, तेव्हा त्यांनी शिंदे गटासह भाजपावर जोरदार टीका करत त्यांना खडे बोल सुनावले. शिंदे यांचे 35 आमदार फुटणार असा पुनरुच्चार त्यांनी केला.

निवडणुका उद्यावर येऊन ठेपल्या आहेत आणि मंत्री म्हणतात 1 तारखेला लक्ष्मी दर्शन होईल. निवडणूक आयोगाने याकडे लक्ष दिलं पाहिजे. नगर पालिका नगर पंचायत निवडणुकीत जशी सुरू आहे. महाराष्ट्रात नगरपालिका किंवा नगरपंचायत निवडणुकीमध्ये पैशांचा इतका प्रचंड खेळ कधी झाला नव्हता.

शिंदे शिवसेना वि. भाजप अशी स्पर्धा निवडणुकीत दिसत आहे का असा सवाल राऊत यांना विचारण्यात आला. मुळात शिंदे यांची शिवसेना असं म्हणायला आम्ही तयार नाही. आणि शिंदे सेनेचा कोळथा हे दिल्लीचे अमित शहा काढणार. ज्या पद्धतीने त्यांनी शिवसेनेबाबत केलं, त्याच पद्धतीने शिंदे यांचे आमदार फोडण्याचं काम अगदी व्यवस्थित सुरू आहे. रवींद्र चव्हाण हे भाजपचे प्रदेशाध्यक्ष आहेत, त्यांची नेमणूक त्यासाठीच केली आहे. हे राजकारण समजून घेतलं पाहिजे.

यांना (शिंदे) वाटत असेल की दिल्लीचे 2 नेते आमच्या पाठीशी आहेत, पण ते कोणाचेच नाहीत, कोणाच्याच पाठिशी नाहीत. त्यांनी ाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेच्या पाठीत खंजीर खुपसताना मागेपुढे पाहीलं नाही, तर मग हे शिंदे कोण? शिंदे यांचा पक्ष आधीच फुटलेला आहे. हा अमित शहा यांनी निर्माण केलेला गट आहे, हा अमित शहांचा पक्ष आहे, शिंदेंचा पक्ष नाही, असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## चिमुरडीवर अत्याचाराचा प्रयत्न

■ वृत्तसंस्था, कोल्हापूर, दि. १ :
कोल्हापूर जिल्ह्यात एका अवघ्या सात वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचाराचा प्रयत्न झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. संबंधित मुलगी आपल्या आईसोबत एका नातेवाईकाच्या लग्नाला गेली होती. तेथे उपस्थित असलेल्या 28 वर्षीय विकास कांबळे नावाच्या युवकाने तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला.

अचानक घडलेल्या या प्रकारामुळे लग्नाच्या ठिकाणी एकच खळबळ उडाली. मात्र, मुलीने योग्य वेळी आवाज दिल्याने आणि लोक जमताच आरोपीचा मनसुबे फसला आणि मोठा अनर्थ टळला. या घटनेनंतर पीडित मुलगी व तिचे कुटुंबीय भीतीत असून पोलिसांनी तत्काळ दाखल होऊन आरोपीला ताब्यात घेतले आहे.

कात्यायनी ते गिरगाव या मार्गावर लग्नातील काही लोकांसोबत मुलगीही फिरण्यासाठी गेली होती. त्याचवेळी आरोपी विकास कांबळे तिच्या मागोमाग जाऊन तिला जबरदस्तीने उसाच्या शेतात ओढून नेण्याचा प्रयत्न करू लागला. आरोपीने मुलीवर अत्याचार करण्याचा डाव आखला होता. परंतु अचानक झालेल्या या हल्ल्याने मुलगी धास्तावून गेली आणि तिने मोठ्याने आरडाओरडा सुरू केला.

तिच्या आवाजाने आसपासच्या लोकांनी घटनास्थळी धाव घेतला. लोक जवळ येताना पाहून आरोपीने पळ काढण्याचा प्रयत्न केला. परंतु नागरिकांनी त्याला पकडून पोलिसांच्या हवाली केले. इस्पूर्ली पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

## शिवसेना - भाजप कटुता संपवणार?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :
नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकीच्या रणधुमाळीत भाजप - शिवसेना युतीत उफाळलेला राग, आरोपांची धग आणि आतल्या आत साचलेली कटुता हे सगळं पाहता महायुतीसमोर उभं राहिलेलं संकट आता दिल्लीने थेट हातात घेतल्याची माहिती समोर आली आहे. आगामी महापालिका निवडणुकांपूर्वी युती फुटण्याचा धोका टाळण्यासाठी भाजपचे केंद्रीय नेतृत्व आता स्वतःच मध्यस्थी करणार आहे.

नगर परिषदांच्या प्रचारादरम्यान दोन्ही पक्षांतील संघर्ष चव्हाट्यावर आला. सिंधुदुर्गमध्ये शिवसेनेचे आमदार नीलेश राणे यांनी दाखवलेला कथित पैसेवाटपाचा व्हिडीओ, त्यानंतर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची २ तारखेपर्यंत युती टिकवायची आहे, ही तिरकस प्रतिक्रिया आणि मग पश्चिम महाराष्ट्रातील सभेत पुन्हा शिवसेनेवर साधलेला निशाणा, या सर्वांनी युतीतील नातेसंबंधांवर आणखी मीठच चोळले.
दरम्यान, राष्ट्रवादी (अजित पवार गट) मात्र शांत असून भाजपसोबतच राहण्याचा निर्धार त्यांनी पुन्हा एकदा व्यक्त केला. तीन तारखेनंतर काहीही झालं तरी आम्ही एनडीएसोबत ठाम, अशी घोषणा सुनील तटकरे यांनी केली.

येत्या महिनाभरात राज्यातील २९ महापालिका – म्हणजे मिनी विधानसभा – निवडणुका होणार आहेत. मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड या प्रमुख महापालिकांच्या जागावाटपावरून आधीच दोन्ही पक्षांमध्ये ठिणग्या पडल्या आहेत. ठाणे व कल्याण डोंबिवलीमध्ये तर दोन्ही पक्ष एकमेकांसमोर उभे राहण्याची शक्यता स्थानिक पातळीवरून बोलली जात आहे. संघर्ष जसा वाढतोय, तशी महायुतीची गणितं धोक्यात येत असल्याची चिंता केंद्राला स्पष्टपणे जाणवत आहे.

यामुळेच नगर परिषद, नगर पंचायत निकालानंतर दिल्लीतील भाजप नेतृत्व महाराष्ट्रातील दोन्ही पक्षांच्या वरच्या पातळीवर थेट बसून तोडगा काढणार आहे.

भाजपच्या अंतर्गत सर्वेक्षणानुसार १७० हून अधिक नगराध्यक्ष भाजपकडे झुकत असल्याने स्वतःला पुन्हा मोठा भाऊ सिद्ध करण्याची संधी पक्षाला मिळणार आहे. पण महाविकास आघाडीला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी शिवसेना आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) या दोघांचीही साथ अपरिहार्य आहे, हे दिल्लीला ठाऊक आहे. त्यातूनच दिल्लीने या प्रकरणात मध्यस्थीचे प्रयत्न चालवले आहेत.

## राजेश अग्रवाल यांनी स्वीकारला मुख्य सचिव पदाचा पदभार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :
मावळते मुख्य सचिव राजेशकुमार यांच्याकडून नवनियुक्त मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आज पदभार स्वीकारला. शासनाने राज्याच्या मुख्य सचिव पदावर अग्रवाल यांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित केले होते.

मंत्रालयातील मुख्य सचिवांच्या दालनात झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा वर्मा, सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा, कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव (अ.व.सु) राधिका रस्तोगी, मदत पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वैद-सिंगल, ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव श्रीकर परदेशी, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकज कुमार, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन, दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंडे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अमित सैनी यांच्यासह मुख्य सचिव



कार्यालय व अन्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्राचा विकास आणि गौरव वाढविण्यासाठी प्रभावीपणे कार्यरत राहीन असे मुख्य सचिव पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर अग्रवाल म्हणाले.

राजेश अग्रवाल हे भारतीय प्रशासकीय सेवेतील महाराष्ट्र कॅडरचे 1989 चे अधिकारी असून त्यांचे मूळ गाव पंजाबमधील जालंधर हे आहे. त्यांनी कॉम्प्युटर सिस्टिम विषयामध्ये बी.टेक केले आहे.

आपल्या सेवाकाळात त्यांनी सहायक जिल्हाधिकारी रत्नागिरी, जिल्हा परिषद जळगाव येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला येथे जिल्हाधिकारी, महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथे उप विशेष आयुक्त, केंद्रीय ग्रामविकास राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, भारत निवडणूक आयुक्त कार्यालयात संचालक, मंत्रालय मुंबई येथे सामान्य प्रशासन विभागाचे सचिव, इंटर्नल एक्स्चेंज ऑफ इंडिया नवी दिल्ली येथे राष्ट्रीय अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, मंत्रालय मुंबई येथे कृषी, मत्स्यव्यवसाय विभागात सचिव, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागात सचिव (अतिरिक्त कार्यभार), वित्त विभागात सचिव, सामान्य प्रशासन विभागात प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान), वित्त वित्त विभागात सचिव, केंद्र सरकारच्या वित्त सेवा विभागात सह सचिव, केंद्र सरकारच्या आदिवासी विकास विभागात सह सचिव, केंद्र सरकारच्या कौशल्य विकास विभागाचे महासंचालक (प्रशिक्षण), पेट्रोलियम आणि नॅचरल गॅस विभागात अतिरिक्त सचिव आणि वित्त सल्लागार, केंद्र सरकारच्या कौशल्य विकास विभागात सचिव, केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय विभागात सचिव, मंत्रालय मुंबई येथे सामान्य प्रशासन विभागात अतिरिक्त मुख्य सचिव अशा विविध पदांवर काम केले आहे.

## प्रारुप मतदार यादीत गंभीर चुका

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १ :
राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची जोरदार लगबग सुरू आहे. या निवडणुकांवर अंधार टाकणारा एक मुद्दा मोठ्या प्रमाणावर डोकावत आहे. तो म्हणजे प्रारूप मतदार याद्यांतील गोंधळ, मतदारांच्या नावांतून झालेली कपात, चुकीचे विभागणी, आपला मतदानाचा हक्क हिरावला जाईल



याची भीती अशा अनेक तक्रारी वाढू लागल्याने मतदार ते विरोधक सर्वत्र अस्वस्थता आहे.

मुंबईतील मतदार यादीत गंभीर चुका झाल्याचा आरटीआयमधून उघड झालेला प्रकार तर विशेष चर्चेचा विषय ठरला आहे. कुर्ला परिसरातील 6,834 मतदारांना चुकीच्या वॉर्डात दाखविण्यात आले आहे. वास्तविक ते वॉर्ड क्रमांक 162 मध्ये असताना त्यांना 163 मध्ये वर्गीकृत केल्याचे समोर आले आहे. मतदानाचा अधिकार हा नागरिकांचा मुलभूत हक्क आहे. त्यातच हजारो मतदार चुकीच्या ठिकाणी दाखवले गेले तर त्यांच्या मतदानावर परिणाम होणारच. त्यामुळे आरटीआय कार्यकर्त्यांनी तातडीने ही चूक दुरुस्त करण्याची मागणी केली आहे आणि नगरपालिका अधिकाऱ्यांना निवेदनही देण्यात आले आहे.

नाशिकमध्येही मतदार याद्यांवरून वाद पेटला आहे. महापालिकेच्या मतदार याद्या जाहीर झाल्यानंतर हजारो तक्रारी समोर आल्याचे दिसून येत आहे1

## साधूग्राममधील झाडे वाचवण्यासाठी रिल्सस्टारही मैदानात

### ७ दिवसांत ९० हजारांवर पोस्ट, १ कोटींवर व्ह्यू : जेन झी चा सोशल लढा

■ महासागर प्रतिनिधी नाशिक, दि. १ :
तपोवनातील साधुग्राम प्रकल्पासाठी प्रस्तावित १८२५ वृक्ष तोडण्यास विरोध करत नाशिकच्या तरुणाईने सोशल मीडियावर लढा सुरू केला आहे. जेन झीकडून व्हायरल केल्या जाणाऱ्या रिल्सने राज्यभरात हा विषय पोहोचवला आहे.

गेल्या ७ दिवसांत वृक्षतोडीविरोधातील ९० हजारांहून अधिक पोस्ट्सने १ कोटींपेक्षाही जास्त व्ह्यू मिळवले आहेत. पर्यावरण संवर्धन किती गरजेचे आहे, हे तरुणाई कलाविष्कारातून घराघरांत पोहोचवत असल्याने आता या आंदोलनाला धार मिळणार आहे.

तपोवनातील वृक्ष हे नाशिककरांसाठीच नव्हे तर पर्यावरणासाठी अत्यंत महत्वाचे आहेत मात्र, कुंभमेळ्यासाठी पालिकेकडून साधुग्राम परिसरातील डौलदार वृक्ष तोडण्याचा घाट घालण्यात आला आहे.

पालिकेच्या या निर्णयाविरोधात नाशिकमधील पर्यावरणप्रेमींनी आंदोलन उभारत जोरदार विरोध सुरू केला आहे. राजकीय पक्षदेखील आता या वृक्षतोडीविरोधात मैदानात उतरले आहेत असे असताना सोशल मीडियावर Save Tapovan Trees, Say No To Tree Cutting, Nashik For Nature असे ट्रेंडिंग हॅशटॅग वापरत हजारो नाशिककर निषेध व्यक्त करत आहेत.



पर्यावरण संवर्धनासाठी झाडांचे महत्त्व, नाशिकचे बिघडलेले वातावरण आणि भविष्यातील धोके दाखवण्यासाठी ह्यजेन झीकडून क्रिएटिव्ह रील्स, इन्फोग्राफिक्स, पोस्ट्सद्वारे डिजिटल वॉर सुरू करण्यात आले आहे. यात नाशिकच्या तरुणांनी वेगवेगळ्या संकल्पना वापरून विषयाचे गांभीर्य दाखवणारे कंटेंट अपलोड करत राज्यभरातील नेटिझन्सचे लक्ष वेधले आहे. यात पालिका आयुक्त तसेच मुख्यमंत्री यांना टॅगही केले जात आहे. संस्कृती असली तरी पर्यावरण जपणेही गरजेचे आहे. अनेक शहरे प्रदूषणाच्या विळख्यात आहेत. नाशिकचाही पर्यावरणीय समतोल बिघडला आहे. अजून वृक्ष तोडले तर भविष्यात श्वास घेणेही अवघड होईल, हे रिल्समधून सांगण्याचा प्रयत्न करत आहे, असे एका रिल्सस्टार्सचे म्हणणे आहे.

वृक्ष तोडून विकास करण्यापेक्षा अन्य ओसाड, पर्यायी जागेचा विचार करावा. निसर्गचक्र बिघडवणाऱ्यांविरोधात आवाज उठवण्यासाठी सोशल मीडियावरून आवाहन करतोय. झाडेच नसली तर माणसाचे आयुष्य बेरंग होईल, ही माझी संकल्पना आहे, असे निकिता लोंढे म्हणाली.
अनन्या शिंदे म्हणते की, मोकळा श्वास घ्यायचा, तर वृक्षसंपदा गरजेचीच आहे. पर्यावरणापेक्षा कोणीही मोठे नाही. साधुग्रामच्या वृक्षतोडीमुळे मोठी हानी होईल. यात राजकारण आणणे चुकीचे आहे. वृक्षतोडीचा निर्णय घेणाऱ्यांनी गांभीर्याने विचार करावा. सोशल मीडियावर पोस्ट, रिल्स टाकून पर्यावरण संवर्धनासाठी लढा सुरू आहे.

दुसरीकडे, कोल्हापूरच्या ऋचिका खोतने तपोवनातील वृक्षतोडीविरोधात खास व्हिडीओ तयार केला आहे. प्रत्यक्ष नाशिकला येणे शक्य नसले तरी कलेच्या माध्यमातून आंदोलनालापाठिंबा देत असून त्यासाठी कोल्हापुरात गाणे तयार करून सोशलमीडियावर पोस्ट केले. त्याला नेटिझन्सकडून जोरदार प्रतिसाद मिळत आहे. या वृक्षतोडीविरोधात आता राज्यभरातून विरोध होवू लागला आहे.

## अनुपम खेर यांना डीएव्ही रत्न पुरस्कार



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १ :
शिमला येथील डीएव्ही पब्लिक स्कूलचे माजी विद्यार्थी असलेले प्रसिद्ध अभिनेते अनुपम खेर यांना राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते डीएव्ही रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राजभवन येथे राज्यपालांच्या हस्ते डीएव्ही व्यवस्थापन समितीतर्फे संस्थेच्या प्रथितयश माजी विद्यार्थ्यांचा सत्कार नुकताच करण्यात आला. राज्यपालांनी यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच विविध क्षेत्रांच्या माध्यमातून देशाला योगदान देत असल्याबद्दल त्यांना कौतुकाची थाप दिली.

शिमला येथील डीएव्ही पब्लिक स्कूल येथे आपण पहिली ते अकरावी इतकी वर्षे शिक्षण घेतले. या संस्थेने आपल्याला भारतीय मूल्ये तसेच देश भक्तीचे संस्कार दिले, असे सांगताना आपल्या जीवनात डीएव्ही पब्लिक स्कूलचे महत्व अनन्य साधारण असल्याचे अनुपम खेर यांनी सांगितले. त्या काळातले शिक्षक विद्यार्थ्यांना कठोर शिक्षा द्यायचे, परंतु ते प्रेम व संस्कार देखील द्यायचे असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला राज्यपालांच्या पत्नी दर्शना देवी, डीएव्ही कॉलेज व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पूनम सुरी, डीएव्हीच्या संचालिका डॉ. निशा पेशीन तसेच संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# मूर्तिजापूर शहरात पोलिसांचे पथसंचलन

**मूर्तिजापूर** : आगामी मूर्तिजापूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता, सुव्यवस्था आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी मूर्तिजापूर शहर पोलिसांकडून रविवारी शहरात पथसंचलनकरण्यात आले निवडणुकीच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, मतदारांना निर्भयपणे मतदान करता यावे आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी, हा या मार्चचा मुख्य उद्देश होता. निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस दलाचे सामर्थ्य दर्शवणे, असामाजिक घटकांवर वचक बसवणे आणि शहरातील शांतता अबाधित राखणे. शहरातील मुख्य बाजारपेठा, संवेदनशील भाग आणि संभाव्य अशांतता निर्माण होण्याची शक्यता असलेल्या परिसरांतून हे पथसंचालन काढण्यात आले यामध्ये बस स्थानक, मुख्य रस्ते आणि दाट वस्तीच्या भागांचा समावेश होता. यावेळी शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजीत जाधव, सहायक पोलीस निरीक्षक पवार, उपनिरीक्षक गणेश सूर्यवंशी यांच्यासह २५ अंमलदार ११ राज्य राखीव दलाचे पोलिस कर्मचारी, ७० गृहरक्षक दलाचे सैनिक यांनी पथसंचालनाम ध्ये सहभाग घेतला. त्यांच्या हातात लाठ्या (काठ्या) होत्या आणि ते शिस्तीत चालत होते. पोलिसांचे आवाहन यावेळी पोलिसांनी नागरिकांना आचारसंहितेचे पालन करावे.

### श्री गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाचे आयोजन

# उपक्रमांची माहिती सर्वदूर पोहोचवा :जल्हाधिकारी

**अकोला,दि १ (प्रतिनिधी) :**
'हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर' यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त राज्य शासन आणि शहिदी समागम राज्यस्तरीय समितीच्या संयुक्त विद्यमाने ७ डिसेंबर रोजी नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीत भव्य कार्यक्रम होणार आहे. जिल्ह्यातील, तसेच विदर्भातील अनेक भाविक यावेळी नागपूरला जाणार आहेत. जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात असून, आवश्यक सुविधांची पूर्तता व्हावी. या उपक्रमांची माहिती सर्वदूर पोहोचवा, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले. जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत समिती सदस्य व समाजबांधवांच्या उपस्थितीत बैठक महसूलभवनात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. गुरमितसिंग गोसल, इंद्रजीतसिंग गुजराल, सुरजीतसिंग अकाली, रमेश पवार, विजय चव्हाण, म हापालिका आयुक्त सुनील लहाने, निवासी



उपजिल्हाधिकारी विजय पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर आदी उपस्थित होते. श्री गुरू तेग बहादूर हे शीख समाजाचे नववे गुरू आहेत. मानवाधिकारांच्या सुरक्षेसाठी कार्य करताना ते शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, मानवता, करूणा आणि धैर्य या मूल्यांचा संदेश दिला. श्री गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमानिमित्त नागपूर येथे भव्य कार्यक्रम होत आहे. अकोला जिल्ह्यातून शेकडो भाविक उपस्थित राहणार आहेत. त्यादृष्टीने आवश्यक नियोजन व सुविधांची पूर्तता करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी यावेळी दिले. श्री गुरू तेग बहादूर यांच्या कार्याचा आणि हौतात्म्याचा इतिहास सर्वदूर विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून पोहोचविण्यात येणार आहे. अकोला येथेही मोटरसायकल रॅली व इतर उपक्रमांचे आयोजन होत आहे.गौरवशाली इतिहासाच्या स्मृती सोहळ्यानिमित्त शीख, सिकलीगर, बंजारा,लबाना, मोहयाल, सिंधी समाजाचे गुरुबंधुत्व नाते अधिक दृढ होणार आहे. समन्वय समितीच्या माध्यमातून प्रचार व प्रसाराचे कार्य यशस्वीपणे पार पाडणार आहे. श्री गुरू तेग बहादूर यांची शहादत व योगदान हे धर्म आणि मानवतेच्या रक्षणाचे तेजस्वी प्रतीक आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या शौर्याचा आणि श्रद्धेचा गौरव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमामुळे या सहा समाजाच्या गौरवशाली, पराक्रमी आणि धर्मनिष्ठ इतिहासाला नवे बळ मिळणार असून गुरुबंधुत्वाचा हा पवित्र वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# खुनाच्या गुन्हयातील आरोपी अर्ध्यातासात अटक

## बाळापूर तालुक्यातील उरळ येथील घटना

**अकोला,दि १ (प्रतिनिधी) :**
घटनेची हकीकत अशा प्रकारे आहे की, दिनांक ०१/१२/२०२५ रोजी यातील फिर्यादी यांनी पो स्टे ला येवुन लेखी रीपोट दिला की, दिनांक ०१/१२/२०२५ रोजी यातील फिर्यादी याचा चुलतभाऊ गौरव गणेश बायस्कार वय २२ वर्ष हा व त्याचा मित्र मंगेश मुरलीधर नागोलकार हे त्याचे शेतातील स्लीक्लरची शिप पलटुन घरी येत असतांना कारंजा रमजानपुर फाटयावर आम्हाला माझा चुलत भाऊ राम नागोलकार, कीष्णा जीनगर, प्रणव इंगळे याचे विधीसर्घषीत बालक, विजय मोरे संतोष मोरे यांचे सोबत आपसात भांडण सुरू असतांना दिसले म्हणुन मी व गौरव बायस्कार असे आम्ही दोघांनी तेथे जावुन त्यांचा वाद सोडवण्याचा प्रयत्न केला असता विजय मोरे व संतोष मोर व विधीसंर्घषीत बालक सर्व रा. लोहारा हे राम नागोलकार याला चापटा बुक्यांनी मारहाण करीत होते म्हणुन मी व गौरव बायस्कार हा त्याचा मध्ये जावुन त्याचा वाद सोडवण्याचा प्रयत्न करीत असतांना विजय मोरे व संतोष मोरे या दोघांनी अचानकपणे त्याच्या कमरेतुन एक एक धार धार शस्त्र चाकु काढले व विजय मोरे याने गौरव बायस्कार यांच्या छातीवर चाकु खुपसला व संतोष मोरे याने त्याच्या कमरेतुन चाकु काढुन



गौरव बायस्कार यांच्या पोटावर चाकु ने वार केले व विधीसर्घषीत बालक हा त्याला मारहाण करीत होता त्यामुळे गौरव बायस्कार यांच्या छातीतुन व पोटातुन जास्त प्रमाणात रक्त स्त्राव झाल्यामुळे गौरव बायस्कार हा जागेवरच मरण पावला. तसेच राम नागोलकार याच्या वर सुध्दा चाकु ने वार केला असता त्याने तो वार चुकवुन राम नागोलकार हा तेथुन घाबरून पळुन गेला. माझा चुलत भाउ गौरव गणेश बायस्कार याला जिवानिशी ठार मारणारे विजय मोरे व संतोष मोरे व विधीसंर्घषीत बालक हे तेथुन पळुन गेले असे मला मंगेश मुरलीधर नागोलकार याने सांगीतले अशा फिर्यादीचे जबानी रीपोटवरून सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला सदर गुन्हयामध्ये मा. पोलीस अधिक्षक साहेब, अकोला, मा. अप्पर पोलीस अधिक्षक सो अकोला, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सो बाळापुर यांचे मार्गदर्शनाखाली, ठाणेदार पोलीस स्टेशन पंकज कांबळे, पोउपनि गणेश कांयदे, पोउपनि अरुन मुंडे आदि होते.

## थोडक्यात

### बाळापूर नगर परिषद निवडणूक शहरातील ९ संवेदनशील केंद्रांवर विशेष बंदोबस्त

**बाळापूर** : पालिका शहरात ४३ मतदान केंद्रांवरून मतदान प्रक्रिया २ डिसेंबर रोजी पार पडणार आहे. शहरातील 'त्या' ९ संवेदनशील मतदान केंद्रावर कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, याकरिता विशेष पोलिस बंदोबस्त राहणार असून प्रशासनाचीही करडी नजर राहणार आहे. बाळापूर शहरातील केंद्र क्र. ८ नगर परिषद प्राथ. उर्दू शाळा किल्ला उत्तर भाग, केंद्र क्र. ९ नगर परिषद प्राथमिक उर्दू शाळा किल्ला दक्षिण भाग, केंद्र क्र. १७ पंचायत समिती माहिती केंद्र छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, केंद्र क्र. ३६ न.प. हुसामोद्दीन खतीब सभागृह दक्षिण भाग, केंद्र क्रं. ३६ न.प. हुसामोद्दीन खतीब सभागृह पूर्व भाग, केंद्र क्र. ४० नगर परिषद मराठी कन्या शाळा तेलीपुरा दक्षिण भाग, केंद्र क्रं. ४१ न.प. मराठी कन्या शाळा तेलीपुरा उत्तर भाग, केंद्र क्रं. ४२ न. प. मराठीकन्या शाळा तेलीपुरा पचिम भाग, केंद्र क्र.४३ न.प. मराठी कन्या शाळा तेलीपुरा पूर्व भाग, वरील संवेदनशील असलेल्या ९ मतदान केंद्रांवर विशेष पोलिस बंदोबस्त राहणार आहे. आधीच निवडणूक प्रक्रिया कमी कालावधीत झपाट्याने होत असतानाच बाळापूर न.प. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराविरोधात न्यायालयात याचिका दाखल झाली आहे. याचा निकाल शनिवारी लागणार होता म त्र आता तो सोमवार, १ डिसेंबरला लागणार असल्याने बाळापूर न.प. मध्ये व्होटर मशीन सील करण्याचे काम सोमवारी निकालानंतरच होणार आहे. यामुळे निवडणूक विभागाची चांगलीच धावपळ होणार आहे.

### मंदिरातील दानपेटी फोडून रक्कम लंपास

**बोरगाव मंजू** : पोलिस ठाण्याच्या हद्दीतील तीर्थक्षेत्र चंडिका देवी मंदिर संस्थान कुरणखेड येथील मंदिरातील दान पेटी फोडून अज्ञात भामट्यांनी रक्कम लंपास केली. मध्यरात्री सुमारास सदर अज्ञात भामट्यांनी पेटी फोडून रक्कम लंपास केली दरम्यान ही घटना सकाळी उघडकीस आली, सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार चंडिका देवी मंदिरातील मुख्य प्रवेशद्वारातून आत प्रवेश करुन मंदिरातील व एक हनुमंत मंदिरातील दान पेट्या बाहेर काढून मंदिराच्या खालील सभागृहात आनुन फोडून रक्कम लंपास केली, दरम्यान ही घटना सकाळी उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच बोरगाव मंजू ठाणेदार अनिल दान पात्रगोपाळ, ज्ञानेश्वर लांडे, पुढील कारवाई पोलिस करीत आहे.

# खा.अनुप धोत्रे यांच्या प्रयत्नाला यश निंबी रस्त्याच्या कामासाठी डीपीडीसीतुन निधी मंजूर!

**बाळापुर,दि १ (प्रतिनिधी) :**
बाळापूर तालुक्यातील निंबी गावाला जोडणाऱ्या रस्त्याची दुरावस्था झाल्या मुळे या रस्त्यावर वाहन चालवीने तर सोडाच पण पायी चालणे देखील कठीण झाले होते यामुळे निंबी ग्रामवासी वैतागून गेले होते.

या संतापातुन ग्रामवासियांनी पालकमंत्री ना आकाश फुंडकर, खा अनुप धोत्रे, जिल्हाधिकारी अकोला, तहसीलदार बाळापूर यांना निवेदन देऊन होऊ घातलेल्या जि प व पंचायत समिती निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा इशारा दिला होता यावर खा अनुप धोत्रे यांनी तातडीने लक्ष घालून जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर यांना पत्र देऊन निंबी फाटा ते निंबी गाव यासाठी ४२-५ ( साडे बे चाळीस लक्ष रुपये) व निंबी ते सागद या रस्त्यावर साडे बे चाळीस लक्ष रुपये निधी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून मंजूर केला असून याच निविदा प्रक्रिया काम पुर्णत्वाकडे असून लवकरच काम खा अनुप धोत्रे यांच्या प्रयत्नाने सुरु होणार आहे

बाळापूर तालुक्यातील निंबी गावाचा रस्त्यावर मागील २५ वर्षांपासून कुठल्याही



निंबी वासियांनी दिला होता मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा खा अनुप धोत्रे यांना दिले होते निंबी वासियांनी निवेदन

प्रकारचे काम झालं नसल्याने संपूर्ण रस्ता उखाडला होता प्रत्येक निवडणुकीत मत मागायला येणाऱ्या प्रत्येक पक्षाच्या लोकप्रतिनिधी कडे गावकरी रस्त्याच्या कामाची मागणी करत होते परंतु त्यांना लोकप्रतिनिधी कडून पोकळ आश्वासना पलीकडे काहीच मिळत नव्हतं याला निंबी ग्रामस्थ वैतागून गेले होते त्याला शेवटचा पर्याय म्हणून येथील ग्रामस्थांनी जि प व पं स निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आणि त्याचं निवेदन जिल्ह्याचे पालकमंत्री ना आकाश फुंडकर, खा अनुप धोत्रे, जिल्हाधिकारी अकोला, तहसीलदार बाळापूर यांना दिलं होतं संवेदनशील युवा खासदार अनुप धोत्रे यांनी निंबी वासियांच्या रस्त्याच्या प्रश्नांची तातडीने दखल घेऊन पालकमंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार करून जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून रस्त्याच्या कामासाठी निधी मंजूर केला असल्यामुळे निंबी वासियांना लवकरच पक्का रस्ता मिळणार आहे.

# हेमंतात बहरला वसंत

**अकोला,दि १ (प्रतिनिधी) :**
सरत्या वर्षातील शेवटच्या महिन्यात भोवतालच्या निसर्गात सोबत आकाशातही विविध खगोलीय घटनांचा नवा बहर अनुभवण्यासाठी प्रत्येक मानवी जीवाने सज्ज होण्याचे आवाहन विश्वभारती केंद्राचे प्रमुख प्रभाकर दोड यांनी केले आहे. सध्या स्थितीत सूर्य वृश्चिक राशीतील लाल रंगाच्या ज्येष्ठा नक्षत्रात तर रात्रीच्या प्रारंभी पूर्व आकाशात वृषभ राशीतील ठळक तारका रोहिणी दिसेल.याच वेळी आकाश मध्याशी मीन राशीतील शनी ग्रह पाहता येईल.रात्री साडेआठच्या सुमारास पूर्व आकाशात मृग नक्षत्र आणि एका तासांनी मिथुन राशीतील गुरु ग्रह व पहाटे गुलाबी थंडीत पूर्वेस बुध आणि शूक्र बघता येईल.

सोळा देशांच्या संयुक्त प्रयत्नातून साकारलेली संपूर्ण जगात महाग असलेले महाकाय आकाराचे इंटरनॅशनल स्पेस स्टेशन अर्थात (अंतराळ संशोधन प्रयोगशाळा) दर ताशी अठ्ठावीस हजार कि.मी एवढ्या प्रचंड वेगाने केवळ दीड तासात एक पृथ्वी प्रदक्षिणा पूर्ण करतांना ज्या मार्गाने फिरते त्या भागातील लोकांना ते नुसत्या डोळ्यांनी पाहता येते.अशी ही फिरती चांदणी २ ते ५ डिसेंबर या सलग चार दिवसांत संध्याकाळी पाहता येईल. इच्छूकांना याचा लाभ विश्वभारती केंद्रावर दि.३ ते ५ रोजी विनामूल्य घेता येईल.दि.२ ला रात्री ७-०९ ते ७-११ या दोन मिनिटात वायव्य आकाशातून चंद्राकडे जातांना मध्येच विलूप्त होईल.दि.३ ला संध्याकाळी ६-२२ ते ६-२८







या वेळेत उत्तरेकडून पूर्वेकडे जातांना ६-२६ ला चंद्राजवळ दिसेल.दि.४ रोजी ७-११ ते ७-१६ या वेळेत पश्चिमेकडून दक्षिणेकडे जाईल.याच दिवशी पृथ्वी आणि चंद्र यामधील अंतर कमी असल्याने सुपर मून रोहिणीच्या वर तर कृत्तिका जवळ बघता येईल.यावेळी चंद्र आकाराने चौदा टक्के मोठा व तीस टक्के अधिक प्रकाशित राहील.दि.५ ला संध्याकाळी ६-२३ ते ६-२९ या वेळेत वायव्य आकाशातून दक्षिणेकडे जातांना ६-२८ वा. शनी ग्रहाच्या खाली दिसेल.

दिवसभरातील ताण तणावातील भार कमी करण्यासाठी या हेमंतातील वसंत बघता येईल म्हणून काहीशी उसंत घेऊन आकाश संगतीला पसंत करावे.

### नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक

# अकोट-पोपटखेड रस्ता वाहतुकीत बदल

**अकोला,दि १ (प्रतिनिधी) :**
अकोट नगरपरिषद क्षेत्रात निवडणुकीचे मतदान व मतमोजणी प्रक्रियेच्या अनुषंगाने अकोट-पोपटखेड या रस्त्यावरील वाहतुकीत दि. २ डिसेंबरला सायं. ६ ते रात्री ९ आणि दि. ३ डिसेंबरला सकाळी ६ ते सायंकाळी ६ वा. पर्यंत बदल करण्यात आला आहे. जिल्हा दंडाधिकारी वर्षा मीना यांनी याबाबतचा आदेश निर्गमित केला.न. प. क्षेत्रातील मतदान पूर्ण झाल्यानंतर दि. २ डिसेंबरला सायं. ६ वाजता मतपेट्या पोपटखेड रस्त्यावरील आयटीआय येथील ट्रायसेम हॉल येथे नेण्यात येणार आहेत. त्यामुळे अकोट ते पोपटखेड मार्गावरील वाहतुकीसाठी यादिवशी सायं. ६ ते रात्री ९ या वेळेत अकोटकडून पोपटखेडकडे जाणा-या वाहनांनी जुना बोर्डी रस्ता ग्रामीण रूग्णालय अकोट मार्गाचा वापर करावा, तसेच पोपटखेडकडून अकोटकडे येणा-या वाहनांनी मोहाळा- अकोलखेड मार्गे अंजनगाव रस्त्याचा वापर करावा.त्याचप्रमाणे, मतमोजणीच्या दिवशी (३ डिसेंबर) मतमोजणी आयटीआयमधील ट्रायसेम हॉल येथे असल्याने अकोट ते पोपटखेड रस्त्यावर सर्वपक्षीय उमेदवार तसेच समर्थकांची गर्दी होणार असल्याने वाहतुकीस अडथळा येऊ शकतो. त्यामुळे यादिवशी सकाळी ६ वा.पासून ते सायं. ६ वाजेपावेतो अकोटकडून पोपटखेडकडे जाणा-या वाहनांनी जुना बोर्डी रस्ता- ग्रामीण रुग्णालय मार्गाचा वापर करावा, तसेच पोपटखेडकडून अकोटकडे येणारी वाहने मोहाळा - अकोलखेड मार्गे अंजनगाव रस्त्याने यावी. या कालावधीत पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अकोट न.पा.निवडणुकीत विकासाचा मुद्दा गौण

**अकोला,दि १ (प्रतिनिधी) :**
अकोट नगरपालिका निवडणुकीत जात-पात ,धर्म ,गट-तटाच्या राजकारणात विकासाचा मुद्दा मागे पडला आहे.पैसा व सत्तेची ताकद किती हावी ठरते यावर विजयाचे भवितव्य अवलंबून असल्याचे आचचे चित्र आहे. नगरपालिका निवडणुकीचा प्रचाराचा आजचा शेवटचा दिवस उद्या म तदान. सत्तेतील पक्ष एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले आहे याचा फायदा महाविकास आघाडीला घेता आला असता मात्र तसे चित्र आज दिसत नाही. सततच्या पराभवांमुळे कॉग्रेसचे स्थानिक नेत्यांचे मनोबल खचले की काय अशी परिस्थिती नगरपालिका निवडणुकीत कॉग्रेसची दिसत आहे. जनाधार असलेला एकही कॉग्रेसचा नेता प्रचारात दिसला नाही.याचा परिणाम कॉग्रेसला भोगावा लागेल की काय अशी शंका येते. आमदार भारसाकळे एकहाती भाजपाची सत्ता आणण्यासाठी कंबर कसून आहेत.पण काही ठिकाणी कमी आवाक्याचे उमेदवार दिल्याने फटकाही बसु शकतो. यात शंका नाही. प्रचारात आघाडीवर असलेले सत्तेतील दोन पक्ष सत्ता व पैसा असुनही मतदारांना प्रभावीत करण्यात कमी पडतात की काय? असा प्रश्न उपस्थित करतात. उबाठा, राष्ट्रवादी शरद पवार, प्रहार उमेदवारांच्या बळावर सत्तेत स्थान मिळवतील असा आशावाद आहे. वंचीतचे यश समीकरणांवर अवलंबून आहे.अध्यक्षीय निवडणुकीत वंचित भाजपा लढत होणार असल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. मुस्लिम एकगठ्ठा मतांवर राष्ट्रवादीची मदार आहे. त्यासोबतच भाजपा सोडली तर एम आय एम , काँग्रेस, वंचीत, उबाठा सर्वांचा डोळा मुस्लिम मतांवर आहे. एकगठ्ठाचा प्रयत्न केल्यास हाती काहीच लागत नाही. अनुभवातून बोध घेत यावेळी मतदान होणार आहे ,असे कळते. यामध्ये उमेदवाराच्या जातीय मतांची गोळाबेरीज मुस्लिम मतं वळिवण्यात कळीचा मुद्दा असेल असा सुर आहे. काही ठिकाणी दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ होणार आहे. इतर वेळी तिसऱ्याचा लाभ होऊ नये अशी आवई उठविणारे आता मात्र शांत आहेत. उमेदवारांच्या भाऊ गर्दीतून लोकांच्या कामात पडणारा, नागरीकांच्या हाकेला ओ देणारा, नागरीकांच्या सुख दुःखात सहभागी होणारा आणि नागरीकांच्या प्रश्नांची जाण असलेला आणि प्रश्न कसे सोडवायचे हे माहीती असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देतील असे एका सर्वेक्षणातून समोर आले आहे.

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथे डाएटजिनीचा प्रिव्हेन्टीव्ह हेल्थ चेक अप कॅम्प संपन्न

**अकोला,दि १ (प्रतिनिधी) :**
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, राष्ट्रीय सेवा योजना व विदर्भातील पहिले आयएसओ सर्टिफाईड वेटलॉस क्लिनिक डाएटजिनी यांचे तर्फे फुल बॉडी हेल्थ ॲनालिसिस व एक्सपर्ट कन्सल्टेशन कॅम्प पीकेव्ही विद्यापीठ दवाखाना येथे संपन्न झाला.या कॅम्पचे उद्घाटन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. डी. एम. पंचभाई यांचे उपस्थितीत केले.

यावेळी प्रा. उमेश चिंचम लातपुरे, विद्यापीठ शिक्षण विस्तार अधिकारी तसेच इतर अधिकारी



उपस्थित होते.यावेळी विद्यापीठातील विद्यार्थी, विद्यार्थीनी, ज्येष्ठ संशोधक, प्राध्यापक, विभाग प्रमुख, कर्मचारी तसेच आरोग्याप्रती जागरूक नागरिक यांची आरोग्य तपासणी करून पोटाचे विकार, हृदयविकार, उच्च रक्तदाब, मधुमेह, फॅटी लिव्हर, पीसीओडी, हाडांचा ठिसुळपणा इ. आजारांवर आहार व जीवनशैलीविषयक सल्ला व मार्गदर्शन डाएटजिनीचे संस्थापक डॉ. पंकज प्रधान व डॉ. प्रिती प्रधान यांनी केले. यावेळी आजार व औषधीमुक्त जीवनासाठी नैसर्गिक आहार व जीवनशैली याचे महत्व डॉ. प्रधान यांनी विषद केले.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी एस. एस. हाडोळे सर तसेच विद्यापीठ दवाखान्याचे डॉ. गोपाल दाभळकर, परिचारिका सौ. देशमुख यांचे सहकार्य लाभले.

# स्वाधार योजनेची मुदत संपल्याने विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण

**अकोला,दि १ (प्रतिनिधी) :**
अकोला गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणारी स्वाधार योजना ही महाराष्ट्रातील हजारो विद्यार्थ्यांसाठी आधारस्तंभ ठरली आहे. परंतु या योजनेची मुदत ३० नोव्हेंबर २०२५ रोजी संपल्याने अनेक विद्यार्थी या लाभापासून वंचित राहण्याची भीती व्यक्त करत आहेत.

अकोल्यातील काही विद्यार्थ्यांनी समाजकल्याण सहायक आयुक्त कार्यालयाकडे निवेदन देत या योजनेची तारीख वाढविण्याची विनंती केली आहे.आपल्या अर्जात त्यांनी नमूद केले की, स्वाधार योजनेमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळतो. परंतु मुदत संपल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. त्यामुळे समाजकल्याण विभागाने तात्काळ योजनेची तारीख वाढवून विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा. निवेदन १ डिसेंबर २०२५ रोजी अकोल्यातून सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या हितासाठी ही योजना अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे पवन डोंगरे यांनी सांगितले. निवेदन सादर करताना विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

## विभागीय युवक महोत्सवाचा उत्साहात शुभारंभ
# महोत्सवातून तरूणाईच्या सर्जनशीलतेचा आविष्कार : जिल्हाधिकारी

■अकोला,दि १ (प्रतिनिधी) :
तरूणांतील प्रज्ञा, प्रतिभा व नवसर्जनशीलतेचा आविष्कार युवक महोत्सवासारख्या उपक्रमातून होतो. जीवनात करिअरइतकेच कलागुणांनाही प्राधान्य दिले पाहिजे. त्यातून व्यक्तित्वाचा सर्वांगीण विकास होतो. त्यामुळे आयुष्यात कुठल्याही क्षेत्रात करिअर केले तरी छंद, कलागुण कायम जोपासा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले.

क्रीडा विभागातर्फे विभागीय युवक महोत्सवाचा शुभारंभ वसंत देसाई क्रीडांगणात जिल्हाधिका-यांच्या हस्ते झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट, प्रा. मधू जाधव, शाहीर वसंत मानवटकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. लोकनृत्य, चित्रकला, लोकगीत, वक्तृत्व, कवितालेखन व नवोपक्रम म्हणून विज्ञान प्रदर्शन अशा विविध सादरीकरणांची रेलचेल असलेल्या विभागीय युवक महोत्सवात पाचही जिल्ह्यातील गुणवंत महाविद्यालयांचा सहभाग आहे.




महोत्सव हा प्रज्ञा- प्रतिभांचा संगम असून, युवकांनी आपले कलागुण आयुष्यभर जोपासण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी यावेळी केले. यावेळी त्यांनी विज्ञान प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांकडून त्यांच्या प्रयोगांची माहिती जाणून घेतली. श्री. भट यांनी प्रास्ताविक केले. विकास पल्हाळे यांनी सूत्रसंचालन केले. अनिल निंबाळकर, तेजस्विनी समर्थ, अर्चना गुप्ता, संजय आगाशे, विशाल नंदागवळी, सुभाष धार्मिक, संदीप शेवलकर, स्वप्नील इंगोले, आकाश हराळ, डॉ. अर्जन बी युसुफ शेख, अमोल शिरसाट, नितीन मोहोड, राजेश चौधरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# मुर्तीजापूरात महिला सुरक्षेचा 'शून्य' अजेंडा
## प्रचारात विकासाची ढोलताशा महिलांच्या असुरक्षिततेवर उमेदवार निव्वळ मौन!

■मुर्तिजापुर,दि १ (प्रतिनिधी) :
नगराध्यक्ष आणि नगरसेवक निवडणुकीत उमेदवारांनी विकासाचे स्वप्नवत चित्र रंगवत शहरभर मोर्चेबांधणी, भेटीगाठी, बैठकांचा धुरळा उडवला; पण सर्वांच्या जाहीरनाम्यातील एकच जागतिकरीता लपलेला शब्द म्हणजेङ्कमहिलासुरक्षा. शहरातील मुली, तरुणी, गृहिणी यांच्या दैनंदिन असुरक्षिततेवर उमेदवारांचे निव्वळ मौन पाहून महिला वर्गातून संताप उसळला आहे.रस्ते-नाले-लाईट-मलनिस्सारण यांच्या लाखो रुपयांच्या घोषणा करताना, रात्री निर्भयपणे चालता न येणारे रस्ते, वाढती छेडछाड, सुरक्षित वाहतुकीचा अभाव, सीसीटीव्ही नसलेले अंधारे भाग, पोलिस गस्तेचा अभाव, मुलींच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र योजनाङ्कया कुठल्याही मुद्द्याकडे उमेदवारांचा



थांगपत्ता नाही. ङ्कआमची सुरक्षा धोक्यात ठेवून केलेला विकास आम्हाला मान्य नाही! असा थेट सवाल महिलांनी केला आहे.

वर्षानुवर्षे चर्चेत असलेल्या सूचनामहिला हेल्पलाईन, स्वसंरक्षण प्रशिक्षण, सुरक्षित सार्वजनिक वाहतूकया कागदावरील चर्चे पलीकडे गेल्याच नाहीत. परंतु उमेदवार मात्र अजूनही त्या विकासाच्या जुनाट गप्पांवरच ठाम. महिलांच्या तक्रारींचे गांभीर्य, रात्री वाढणारी भीती, सार्वजनिक ठिकाणची असुरक्षितताङ्कया जिवंत समस्यांना मतांच्या गणितात स्थानच नसल्याचे चित्र उघड दिसत आहे.स्त्रीजीवनावरील अन्याय, दुय्यम स्थान, घरकामाचे अवमूल्यन, आर्थिक अवलंबित्व, विवाहातील असमानताही खोलवर रुजलेली विषमता शहरातील प्रत्येक स्त्रीला आजही भोगावी लागत आहे. पण निवडणुकीच्या रणधुमाळीत या मूलभूत वेदनांना कोणत्याही पक्षाने जाहीरनाम्यात स्थान दिले नाही. स्त्री ही व्यक्ती आहे. सत्याच्या मान्यतेलाही उमेदवारांकडून तिलांजलीच!

येणारी नगरपालिका कोणत्याही पक्षाची असो; जर महिलासुरक्षेला स्वतंत्र बजेट, स्पष्ट धोरण आणि वेळबद्ध अंमलबजावणी न दिली, तर मुर्तीजापूरचा विकास हा फक्त कागदी ढोल ठरणार असा इशारा महिलांनीच दिला आहे.

# अनुशासित शिक्षक हाच संस्थेचा खरा दागिना असतो :सौ स्नेहापप्रभादेवी गहिलोत

■पातुर,दि १ (प्रतिनिधी) :
'अनुशासित आणि शिस्तप्रिय शिक्षक हा शिस्तप्रिय पिढी घडवतो, आपल्या कामाप्रती एकनिष्ठता ठेवून संस्थेचा नावलौकिक वाढवतो आणि देशाच्या उज्वल भविष्य साठी सक्षम पिढी घडवतो' असे प्रतिपादन बेरार एज्युकेशन सोसायटीच्या सचिव सौ स्नेहप्रभादेवी गहीलोत यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले. तुळसाबाई कावल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षिका सौ शुभांगी आयाचित मॅडम यांच्या सेवापूर्ती सोहळ्यात बोलत



होत्या. संयम हा महत्त्वाचा गुण शिक्षकांच्या ठिकाणी असला पाहिजे असे प्रतिपादन यावेळी व्यवस्थापक विजयसिंहजी गहीलोत त्यांनी आपल्या मनोगतात मांडले.स्थानिक तुळसाबाई कावल माध्यमिक विद्यालयातील सौ. शुभांगी अतुल अयाचीत मॅडम यांचा सेवापूर्ती सोहळा नुकताच पार पडला.आपली वीस वर्ष तीन महिन्यांची सेवा पूर्ण करून नियत वयोमानाने त्या सेवानिवृत्त झाल्या. यावेळी संस्थेच्या वतीने त्यांचा शाल,श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी मान्यवरांनी मनोगतातून आपल्या भावना व्यक्त केल्या. सौ अयाचित मॅडम यांचे वडील श्री दिनकरराव जोशी हे आपल्या मुलीच्या सेवापूर्ती सोहळ्याला आवर्जून उपस्थित होते हे विशेष उल्लेखनीय.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्याध्यापिका सौ रश्मी ढेंगे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. के.बी.इंगळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार एस. एस. डोंगरे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# दृष्टी अंतर्मनात खोल नेणे म्हणजेच अध्यात्म-डॉ धनश्री लेले

■अकोला,दि १ (प्रतिनिधी) :
अध्यात्म हा सर्वांसाठी कुतुल व गहनतेचा विषय आहे.तो नेमकेपणाने सांगता येत नाही. अध्यात्म हे सर्व समावेशक आहे. अध्यात्म ाचा संदर्भ ज्याच्या त्याच्या अनुभवातून सिद्ध होतो. ज्याप्रमाणे प्रत्येकाच्या जिभेच्या चवीचा अनुभव हा त्याच्या कल्पनेप्रमाणे वेगवेगळा असतो. तसाच अनुभव अध्यात्म ाच्या संदर्भात प्रत्येकाचा हा वेगळा वेगळा असतो. आपल्या आवडीनिवडी नुसार अध्यात्माची तऱ्हा ही सातत्याने बदलत असते.अध्यात्म या शब्दाचा अन्वयार्थ हा वेगळा असताना तो अनुभवाच्या रूपाने सांगता येत नाही. तसेच तो नेमक्या शब्दाने पण व्यक्त करता येत नाही.वास्तविक विज्ञान हे नेमके सांगू शकते, पण अध्यात्म हे नेम केपणाने सांगू शकत नाही. असा मोठा फरक अध्यात्म व विज्ञानाच्या संदर्भात असल्याचे मत पुणे येथील आध्यात्मिक तज्ज्ञ डॉ धनश्री लेले यांनी केले.स्थानिक कै. काकासाहेब



ठोंबरे स्मृती सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने वाचनालयाच्या संस्थापिका बेबीताई हरीदास यांच्या स्मृतीत जठारपेठ रोडवरील रा.तो.आयुर्वेद महाविद्यालया च्या प्रांगणात आयोजित दोन दिवसीय व्याख्यान मालेत डॉ धनश्री लेले यांनी रविवारी आपल्या समारोपीय व्याख्यानात 'अध्यात्म म्हणजे काय' या विषयावर व्याख्यान सादर केले. प्रा केतकी किशोर देशपांडे यांच्या अध्यक्षतेत व काकासाहेब ठोंबरे सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष डॉ किशोर पिंपरकर यांच्या उपस्थितीत संपन्न या व्याख्यानात डॉ लेले म्हणाल्या, प्रथम अध्यात्म हे समजून घ्यावे लागते. विज्ञानाला प्रयोग लागतो. तर अध्यात्माला योग लागतो.अध्यात्माला श्रद्धा लागते तर विज्ञानाला परीक्षा लागते.ज्ञान व विज्ञान यात मोठा फरक आहे. ज्ञान म्हणजे माहिती नाही. ज्ञान संपादन करणाऱ्याला ज्ञानी म्हणतात.तर ज्ञानी कोण? जर ज्याला आपले ज्ञानतत्व कळाले तो खऱ्या अर्थाने ज्ञानी असल्याचे डॉ लेले यांनी सांगितले.या ज्ञानाची विरुद्ध दिशा म्हणजे विज्ञान होय. विज्ञान हे बाहेरच्या दिशेचा शोध घेते,तर ज्ञान हे आतील दिशेचा शोध घेते. अध्यात्म हे आत्म्याशी आपल्या 'मी' तत्वाशी निगडित आहे. माझ्या 'मी'तत्वाच्या पलीकडे कुणी आहे काय? याचा शोध घेणे म्हणजेच आध्यात्मिक होणे होय. या अंतर्मनातील शोध घेण्यासाठी आंतरिक दृष्टीची गरज आहे. अशी दृष्टी अंतर्मनात येणे म्हणजेच अध्यात्म असल्याचे त्यांनी सांगितले.

# स्थितप्रज्ञ स्थितीसाठी भागवत-पु.गोपाल महाराज

■अकोला,दि १ (प्रतिनिधी) :
प्रभूप्राप्ती साठी मनाच्या स्थितप्रज्ञे सारख्या स्थितीची आवश्यकता असते.ही स्थिती आपले पुण्य मोठ्या उमेदीने संचित करून आपणास भगवंतांच्या अगदी जवळ नेते.अनेक संतानी आपल्या भक्तिने ही स्थिती आपल्या मनात निर्माण करून प्रभू प्राप्ती केली आहे. भक्ती व लय भक्तांच्या जीवनात निर्माण झाली पाहिजे यासाठीच भागवतची निर्मीती करण्यात आली असून संसारात राहून अश्या तात्काळ फलदायक अश्या भागवतची कास धरण्याचाहितोपदेश वेदांताचार्य बालयोगी गोपाल महाराज कारखेड कर यांनी केला.आशिष पवित्रकार मित्र परिवार व भागवत सेवा समिती च्या वतीने गुरुवर्य संत वासुदेव महाराज यांच्या स्मरणार्थ व स्व बाबुराव पवित्रकार यांच्या स्मृतीत जवाहर नगर येथील छत्रपती राजे संभाजी पार्क येथे सुरू असलेल्या वेदांताचार्य बालयोगी गोपाल महाराज कारखेडकर यांच्या श्रीमदब भागवत कथेत त्यांनी कथेचे सहावे पुष्प गुंफले.कृष्ण कथेचा उहापोह करतांना ते म्हणाले,गोपिका या साक्षात प्रभूच्या सन्यासिनी आहेत.

प्रभू प्रेमातच त्यांचे जीवन गेले म्हणूनच त्या कृष्ण कृपेच्या अधिकारी ठरल्या असल्याचे पु गोपाल महाराज यांनी यावेळी सांगितले.गोपिका आपल्या प्राणांची आहुती देण्यासही मागे पुढे बघत नव्हत्या.असें सांगून या सत्रात कृष्ण रुक्मिणी विवाह कथा आपल्या संगीतमय वाणीतून प्रतिपादित केली. दरम्यान कथेत रुक्मिणी विवाह झाकी साकार करण्यात आली.बँड बाजाच्या गजरात व आतिषबाजी करीत या विवाहाची परिसरात वरात काढण्यात आली.अनेक महिला पुरुष भक्त या वरातीत सहभागी झाले होते.पु गोपाल महाराज यांच्या उपस्थितीत हा विवाह मोठ्या भक्तीभावात संपन्न झाला.यात कृष्ण भूमिका जय ठाकरे व रुक्मिणी भूमिका आरती ठाकरे यांनी साकार केली.कथा प्रारंभ प्रसंगी सर्वप्रथम पु गोपाल महाराज यांचे स्वागत डॉ रवींद्र चौधरी, एड मोतीसिह मोहता,डॉ राजेंद्र अग्रवाल,अरविंद अग्रवाल, प्रवीण अग्रवाल, डॉ अशोक सोनोने, रणजित पवार, मोहन अग्रवाल,अभिजित कौशल,लोकेश अग्रवाल, आशुतोष कोरडे,कृष्ण मोरकर,एड अजय वाघमारे, उपस्थित होते.

# गांजा अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या दोघांना अटक

**■आरोपींकडून २४,००० रुपये किंमतीचा गांजा जप्त**

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :
मा. पोलीस अधिक्षक श्री अर्चित चांडक यांचेद्वारा अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत आदेश प्राप्त असून त्यानुसार मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री सुदर्शन पाटील यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक २९/११/२०२५ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी अकोला शहर आणि पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथील विशेष पथकांनी प्राप्त विश्वसनिय माहीतीच्या आधारावर सिटी कोतवाली हद्दीतील ईरानी झोपडपट्टी आणि जनता भाजी बाजार अकोला येथे कारवाया करुन आरोपी नामे अम्रितसिंग बळे रा. इरानी झोपडपट्टी अकोला आणि सुरज सुरेंद्र गुप्ता रा. यांचे ताब्यातून एकंदरीत २४,०००/- रुपये किंमतीचा १.४ किलो प्रतीबंधीत अंमली पदार्थ गांजा कायदेशीर रित्या जप्त केला. प्रकरणा मध्ये नमूद आरोपीतांविरुध्द पोलीस स्टेशन सिटी



कोतवाली अकोला येथे गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियमाच्या विविध तरतूदीं अन्वये दोन स्वतंत्र गुन्हे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री. अर्चित चांडक, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री बी. चंद्रकांत रेड्डी आदिचे सहकार्य लाभले.

# प्रभातच्या गार्गीचा 'विंड मॅनेजिंग होर्डींग' प्रकल्पाची राष्ट्रीय स्तरावर निवड

■अकोला,दि १ (प्रतिनिधी) :
विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, भारत सरकार, नवप्रवर्तन प्रतिष्ठान, अहमदाबाद, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे , राज्य विज्ञान शिक्षण संस्था (प्रादेशिक विद्या प्राधिकरण), नागपूर व भंडारा जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळ आणि एस.जी.बी. डिफ फेन्स सर्व्हिसेस ज्युनिअर कॉलेज, शहापूर ता. जि. भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित इन्स्पायर मानक राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन स्पर्धा २०२४-२५ मध्ये प्रभात किड्स स्कूल, अकोला येथील विद्यार्थिनी कु. गार्गी गरकल हिच्या 'विंड मॅनेजिंग होर्डींग' या प्रकल्पाची टॉप २१ मध्ये निवड होवून राष्ट्रीय स्तरावरील प्रदर्शन व प्रकल्प स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

वादळीवाऱ्यासह पाऊस इत्यादी कारणाने जे मोठमोठे होर्डींग कोसळतात आणि त्यामुळे अपघात, जिवीत हानी, वित्तहानी होते



हा विचार गार्गीच्या डोक्यात आला व तिने 'विंड मॅनेजिंग होर्डींग' हा प्रकल्प प्रभातच्या विज्ञान विभाग प्रमुख मीता इंगळे यांच्या मार्गदर्शनात तयार केला. त्या प्रकल्पाची राज्यस्तरीय 'इन्स्पायर मानक विज्ञान प्रदर्शन' व स्पर्धेमध्ये निवड होवून टॉप २१ मध्ये स्थान प्राप्त करून गार्गीने राष्ट्रीय स्तरावर झेप घेतली. यापूर्वी अकोला महानगर पालिकेचे आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी सुद्धा या प्रकल्पाची प्रशंसा केली होती.प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे, संचालिका सौ. वंदना नारे, सचिव निरज आवंडेकर, प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे, व्यवस्थापक अभिजीत जोशी, समन्वयक मो. आसिफ, सीबीएसई समन्वयक प्रशांत होळकर व प्रभातच्या संपूर्ण विज्ञान विभागाने गार्गीचे कौतुक केले असून राष्ट्रीय स्तरासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## निधन वार्ता

### शोभाताई निंबोकार



**पातुर :** मौजे हिंगणा, ता. पातुर, येथील प्रतिष्ठित जेष्ठ नागरिक श्री सदाशिव बाबन उजाडे, ९०यांचे सोमवार दि. ०१ डिसेंबर २०२५रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे मागे बराच मोठा आप्त परिवार आहे.

### श्रीमती पुष्पादेवी काशिनाथ लहरिया



**अकोला :** बार असोसिएशनचे सदस्य ॲड. मिलींद लहरिया यांची आई श्रीमती पुष्पादेवी काशिनाथ लहरिया त्यांचा आज दि. १/१२/२५ रोजी दुःखद निधन झाले आहे.त्यांची अंत यात्रा मंगळवारी दि. ०२/१२/२५ रोजी त्यांच्या राहते घर चडएइ ऑफिस समोर खेमका अपार्टमेंट , रतनलाल प्लॉट येथून सकाळी ११.०० वाजता मोठी उमरी मोक्षधाम इथे जाईल.त्यांचा
माघे चार मुल , सुना , नातवंड असा मोठा आप्त परिवार आहे

नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होत आहे. यापूर्वी मतदानाच्या दिवशीची जाहीर केलेली सुट्टीकाही मतदारसंघात न्यायालयीन अपील दाखल झाल्यामुळे केवळ त्या मतदारसंघापुरती रद्द करण्यात आली

**CHANGE IN NAME**
I have change my name
**Old Name : Shamim Akhter Mohammad Shaban**
**New Name : Shamim Akhtar Mohd Shaban**
Passport No : N3528397
Address: Sami Plot Patur Tq Patur Distt.Akola 444501 Maharashtra (India)

**CHANGE IN NAME**
I Have Change My Name in My Son Passport No is :- (S5109008)
---------From----------
**JAINAB YUSUF AKOLAWALA**
---------TO--------------
**ZAINAB YUSUF AKOLAWALA**
My Son Name is - BURHANUDDIN YUSUF AKOLAWALA
Address is :- Hakimi mansion Opp ZP Girls School Telipura Chowk Khangarpura Akola Maharashtra 444001.

# पाटील समाजाच्या वतीने ७८२ वा आदर्श विवाह सोहळा संपन्न

■अकोला,दि १ (प्रतिनिधी) :
पाटील समाज वर वधू सूचक बहुउदयशीय मंडळाने आता पर्यंत र्हीींिः//श्ररसरपरसरींहळ.ळप या मंडळाच्या वेबसाईट च्या मश्रध्येमातून ७४९ विवाह जोडले असून आज दि ३० रविवार रोजी ७५०वा आदर्श विवाह सोहळा साई नाथ मंदिर साई नगर येथे संपन्न झाला.मराठा पाटील समाजाच्या आचारसंहितेनुसार २४ तासात लग्न जुळवून आदर्श पद्धतीने विवाह सोहळा पार पडला. आजच्या धकाधकीच्या युगात कोणत्याही प्रकारचा वाजा गाजा बँड बाजा काम न करता कमीत कमी खर्चात व कम ीत कमी लोकांच्या उपस्थितीत विवाह संपन्न करण्यात आला विनाकारण कर्मकांड विधी फटाकेबाजी आर्केस्ट्रा फोटो प्री-वेडिंग व्हिडिओ शूटिंग जेवणाचे अनेक मेनू लोकप्रतिनिधी पुढार्यांची भाषणे न घेता श्रीमंतीचे व्यर्थ प्रदर्शन न करता हळद मेहंदीच्या व्यर्थ खर्चाच्या कार्यक्रम न करता अगदी साध्या पद्धतीने म्हणजे आदर्श पद्धतीने विवाह संपन्न झाला.

बहादूरा हल्ली मुक्काम मात्ता कोकता ता खामगावं जिल्हा बुलढाणा येथील चिरंजीव प्रदीप प्रल्हाद माळी व ची सौ का रूपाली लक्ष्मण उमाळे राहणार बोर वाकडी यांचा आदर्श विवाह केवळ २४ तासात जुळून आयोजित करण्यात आला वराकडून श्री सुभाषराव म्हैसने माजी सैनिक यांनी तर वधू कडून श्री दीपक उमाळे पाटील यांनी मध्यस्थी करून विवाह जोडून आणला




या विवाहप्रसंगी शेतकरी नेते प्रकाश भाऊ पोहरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक सुभाष म्हैसने यांनी तर मार्गदर्शन माननीय प्रकाश भाऊ पोहरे यांनी केले तर संचालन अड संतोष गोळे यांनी केले प्रास्ताविकात सुभाष म्हैसने यांनी मंडळाचे ध्येय धोरण व समाजाला आदर्श विवाह करण्याचे महत्त्व पटवून सांगितले मंडळाच्या वतीने आतापर्यंत एकूण ७८२विवाह जुळवण्यात आले तर म ागील वर्षी एकूण ३३विवाह मंडळाने स्वखर्च ने करण्यात आले तर समाज बांधवाना विनंती करण्यात आली की आपण सांगसाल तेथे १०० लोकांच्या उपस्थिती मध्ये आपन सांगसाल तेव्हा लग्न लावून देण्यास मंडळ सदैव तयार आहे यावर्षी आत्तापर्यंत तिन आदर्श विवाह करून आज दि ३० नोव्ह रोजीचा चौथा आदर्श विवाहअसून कमीत कमी खर्चात व कमीत कमी लोकांच्या उपस्थितीत विवाह करण्याचे महत्त्व विशद केले यावेळी मार्गदर्शनपर भाषणात मा प्रकाशभाऊ पोहरे समाजाला योग्य दिशा देऊन कोठलेही कर्मकांड न करता आदर्श विवाह का करावे.

# ४२ वर्षीय महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

■अकोला,दि १ (प्रतिनिधी) :
रामदास पेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या माळीपुरा कॉम्प्लेक्समध्ये राहणाऱ्या ४२ वर्षीय स्वाती संदीप चौरसिया यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी समोर आली. नेहमीप्रमाणे घरातील सदस्यांनी स्वाती यांना आवाज दिल्यानंतर प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी घरात पाहिले असता त्या गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्या. तत्काळ ही माहिती पोलिसांना देण्यात आली. सूचना मिळताच रामदास पेठ पोलिसांचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी प्राथमिक पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिला रूग्णालयात पाठवला.

RNINO-46973/1986 महासागर अकोला
मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# मानवमुक्तीचा दीर्घ संघर्ष

२ डिसेंबर हा दिवस मानवसभ्यतेच्या इतिहासातील सर्वात काळ्या अध्यायाला आणि त्यावरील संघर्षाला उजाळा देणारा दिवस आहे. "आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिन" हा केवळ एक स्मरणदिन नाही, तर आजही जगभर वेगवेगळ्या स्वरूपात जिवंत असलेल्या आधुनिक गुलामगिरीविरोधातील लढ्याचे प्रतीक आहे. इतिहासाच्या पानावर गुलामगिरी जणू काही भूतकाळातील घटना आहे असे आपल्याला वाटत असले तरी वास्तविकता अतिशय कठोर आहे. आजही जगात लाखो लोक अद्याप गुलामगिरीच्या अंधाऱ्या चक्रात अडकलेले आहेत. मानव सभ्यतेने विज्ञान, शिक्षण, तंत्रज्ञान व लोकशाही सरकारव्यवस्था यांसारख्या क्षेत्रांत अमाप प्रगती केली आहे, परंतु मानवाधिकार, मानवी प्रतिष्ठा आणि समानतेच्या दृष्टिकोनातून पाहता गुलामगिरीचे अनेक स्वरूप आजही समाजाच्या पृष्ठभागाखाली धुमसत आहेत.

---------------

इतिहासात गुलामगिरी ही केवळ आर्थिक मालकीची व्यवस्था नव्हती, तर सत्ता, वर्ण, धर्म, जात, भौगोलिक वंश आणि सामाजिक वर्चस्व यांच्या आधारावर उभी केलेली एक अमानवी संघटना होती. प्राचीन इजिप्त, रोम, ग्रीस, बाबिलोनिया किंवा भारतातील सामंतशाही काळातील शूद्र व दलितांवरील वागणूक असो यामध्ये सर्वत्र गुलामगिरीचे स्वरूप दिसून आले आहे. परंतु मध्ययुगीन वसाहतवादाने या व्यवस्थेला अधिक क्रूर रूप दिले.

विशेषतः आफ्रिकन लोकांना पकडून अमेरिकन देशांत विकण्याची मानवी तस्करी ही इतिहासातील सर्वात क्रूर आणि अमानवी आर्थिक व्यवस्था होती. लाखो लोकांना जबरदस्तीने जहाजांत भरून गुलाम म्हणून विकले गेले, त्यांच्या कुटुंबांना विभक्त केले गेले, त्यांची ओळख, भाषा, संस्कृती, तसेच मानवी अस्तित्वच हिरावून घेतले गेले.
मानवाला पशूपेक्षाही कनिष्ठ गणले गेले. आज आफ्रिकन-अमेरिकन समाजात दिसणारे जातीय विभाजन आणि सामाजिक विषमता हा त्या वसाहतवादी गुलामगिरीचा दाहक परिणाम आहे.

गुलामगिरीविरोधी चळवळीने जगभरात मानवाधिकारांची आणि सामाजिक समानतेची नवी लाट निर्माण केली. १९व्या शतकात ब्रिटन, फ्रान्स आणि अमेरिकेसह अनेक राष्ट्रांनी गुलामगिरीविरोधात कायदे केले आणि अखेर संयुक्त राष्ट्रांनी २ डिसेंबर १९४९ रोजी 'Forced Labour Convention ला मान्यता देऊन गुलामगिरी निर्मूलन करून जागतिक लढा औपचारिक केला. १९८५ पासून ही तारीख "आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिन" म्हणून साजरी केली जात आहे. हा दिवस मानवजातीच्या इतिहासातील एक जागृतीचे प्रतीक ठरतो, जो सांगतो की मानवी स्वातंत्र्य हे कोणत्याही राष्ट्राचे नव्हे तर संपूर्ण मानवजातीचे मूलभूत अस्तित्व आहे.

परंतु आजही खऱ्या अर्थाने गुलामगिरी नष्ट झालेली नाही. संयुक्त राष्ट्रांच्या ताज्या अहवालानुसार जगात अद्याप ५० ते ५५ दशलक्ष लोक आधुनिक गुलामगिरीचे बळी आहेत. ही गुलामगिरी रूप बदलून समाजात खोलवर रुजलेली आहे.

आज गुलामगिरीचे आधुनिक स्वरूप अधिक गुंतागुंतीचे, अदृश्य आणि तंत्रज्ञानाच्या आधारे सक्रिय आहे. मानव तस्करी, बालमजुरी, सक्तीची मजदुरी , जबरदस्तीचे विवाह, लैंगिक गुलामगिरी, अवयव व्यापार, सायबर सेक्स ट्रॅफिकिंग, ऑनलाइन पेड चाइल्ड अब्यूज, घरगुती नोकरांचे शोषण, स्थलांतरित कामगारांचे आर्थिक गुलामीकरण या सर्व आधुनिक गुलामगिरीच्या व्याख्या आहेत.

विशेषतः महिला आणि मुली या गुलामगिरीचे सर्वात मोठे बळी आहेत. बालविवाह, हुंडा, आर्थिक अवलंबित्व, शिक्षणापासून वंचितता आणि लैंगिक शोषणामुळे त्यांना गुलामगिरीच्या दलदलीतून बाहेर येणे कठीण होते.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
समाजशास्त्राचे अभ्यासक

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर गुलामगिरी ही केवळ व्यक्तीगत हिंसाचाराची घटना नाही; तर ती संरचनात्मक हिंसा आहे. समाजातील वर्ग, वर्ण, जात, लिंग आणि सत्ता यांच्या विषमतेतून गुलामगिरी जन्म घेते. समाज जर असमान, अन्यायकारक आणि सत्ताकेंद्रित असेल तर गुलामगिरी आपोआप वाढीस लागते.

भारताच्या संदर्भात पाहिले तर गुलामगिरीचे स्वरूप ऐतिहासिकदृष्ट्या जातिव्यवस्थेच्या आधारावर रचले गेले. दलित, भटके विमुक्त समाज, आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या वंचित समुदायांवर शतकानुशतके स्वयंपूर्णतेचा अधिकार हिरावून घेतला गेला. आजही भारतात बंधकाम मजूर, ईंटभट्ट्या, कारखाने, शेती, मत्स्यउद्योग आणि बांधकाम क्षेत्रात लाखो लोक आधुनिक गुलामगिरीचे बळी आहेत.

भवानी मंडईतील कर्जावर काम करणारे शेतमजूर, घरकामगार, देवदासी प्रथा, तस्करीला बळी पडलेल्या महिला आणि मुली, तसेच बालमजुरी मध्ये अडकलेली मुलं ही उदाहरण या समस्येची गंभीरता दर्शवतात.

जागतिकीकरण आणि भांडवलशाहीने श्रमबाजाराला अधिक असुरक्षित केले आहे. मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या स्वस्त मजुरीच्या शोधात गरीब देशांतील लोकांना शोषतात.

त्यामुळे Consumption-based slavery economy" हा शब्द आज वापरला जातो, ज्याचा अर्थ असा की ग्राहकांनी वापरलेल्या वस्तूंच्या निर्मितीत गुलामांचं श्रम सामील असतं. फॅशन उद्योगातील "Fast Fashion", खनिज उत्खनन उद्योग, साखर, चहा, कोको, हिरे आणि इलेक्ट्रॉनिक उद्योगाच्या उत्पादन प्रक्रियेत मानवाधिकारांचे उल्लंघन सर्वाधिक आढळते.

या परिस्थितीत माध्यमं, शिक्षण, कायदे आणि मानवी हक्क चळवळींची भूमिका महत्त्वाची ठरते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना , Amnesty International, UN Human Rights Office of the High Commissioner, Anti-Slavery International, Free the Slaves सारख्या अनेक संस्थांनी आधुनिक गुलामगिरीविरोधात लढा पुकारला आहे. अनेक देशांनी कठोर कायदे केले परंतु कायद्यापेक्षा सामाजिक जागृतीची कमतरता ही या समस्येचे महत्त्वाचे कारण आहे.

"गुलामगिरी" या शब्दात केवळ बळजबरी, हिंसा, शोषण एवढाच अर्थ नाही, तर त्यात मानवी प्रतिष्ठेचा पूर्ण नाश दडलेला आहे.

समाजशास्त्रातील विचारवंत कार्ल मार्क्स गुलामगिरीला आर्थिक शोषणाचे सर्वोच्च स्वरूप मानतात, तर मॅक्स वेबर यांच्या मते ती सत्ता आणि सामाजिक वर्चस्वाचा सर्वात गुंतागुंतीचा चेहरा आहे. अमर्त्य सेन यांचे मानव-विकास मॉडेल सांगते की स्वातंत्र्य, निवड आणि संधी हे मानवाला उपलब्ध करणेच खरी विकास प्रक्रिया आहे; आणि जिथे गुलामगिरी आहे तिथे विकास असूच शकत नाही.

२१ व्या शतकात गुलामगिरी निर्मूलनाची दिशा ही केवळ कायदेशीर कारवाई नसून ती मानवी संवेदनशीलता, शिक्षण, सामाजिक मूल्यव्यवस्था व आर्थिक समतेचा बदल असायला हवा. आपण समाजाच्या पटलावर असे वातावरण निर्माण केल्याशिवाय गुलामगिरी नष्ट होणार नाही जिथे प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या श्रमाचे, स्वातंत्र्याचे आणि अस्तित्वाचे मूल्य आहे.

आजचा दिवस आपणास हा प्रश्न विचारायला भाग पाडतो की "मानव मुक्त आहे का?" जर समाजात कुणी आर्थिक गरजेमुळे स्वतःला विकत असेल, कुणी जात किंवा वणार्मुळे अपमानित होत असेल, कुणी युद्धामुळे विस्थापित होत असेल किंवा कुण्या मुलाचे बालपण चोरले जात असेल तर मानव सभ्यतेने अजूनही स्वातंत्र्याची खरी व्याख्या गाठलेली नाही.

आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिनाचे खरे सार असे आहे की जगात कुठेही, कोणत्याही स्वरूपात गुलामगिरी असेल तर मानवजात अद्याप परिपूर्ण झाली नाही. स्वातंत्र्य, समानता आणि मानवाचे जीवनमूल्य हे सार्वत्रिक आहेत. ते कोणत्याही राष्ट्राचे, धर्माचे, जातिचे किंवा शासनप्रणालीचे नसून संपूर्ण मानवजातीचे आहेत.

सर्वांनी मिळून हे ठरवले पाहिजे की गुलामगिरीचा शेवट हा इतिहासाचा भाग नव्हे, तर वर्तमानातील ध्येय असले पाहिजे. कारण जिथे मानवाला स्वातंत्र्य नाही, तिथे प्रगती नाही; आणि जिथे समानता नाही, तिथे मानवता नाही.

# राजदला जंगलराजचा फटका!

बिहार विधानसभा निवडणुकीत राजदचा (राष्ट्रीय जनता दल ) झालेला दारुण पराभव हा राज्यातील बरीच राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. २०२० साली विधानसभेच्या ७५ जागा, तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखाली जिंकून, राजदने बऱ्याच अपेक्षा निर्माण केल्या होत्या.

त्या निवडणुकीत आपल्या वाट्याला आलेल्या ७० जागांपैकी फक्त १९ जागा जिंकणाऱ्या कॉंग्रेसची इतकी खराब कामगिरी झाली नसती तर, कदाचित महाआघाडीने ती निवडणुक जिंकली असती आणि तेजस्वी यादव हे बिहारचे मुख्यमंत्री झाले असते. या खेपेस तेजस्वी यादव यांनी बरीच मेहनत घेतली होती. त्यांनी निवडणुक प्रचाराच्या दरम्यान बिहारमध्ये एकूण १८१ सभांना संबोधित केले. कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या व्होटर अधिकार यात्रेत ते सहभागी झाले. शिवाय त्यांनी स्वतंत्र यात्रा काढून, संपूर्ण बिहार पिंजून काढला.



अभय गोखले

निवडणुकीच्या तोंडावर दिड कोटी महिलांच्या खात्यात प्रत्येकी दहा हजार रुपए जमा करण्याच्या नितीशकुमार सरकारच्या खेळीने रालोआला प्रचंड विजय मिळवून दिला.त्याला उत्तर देण्यासाठी, तेजस्वी यादव यांनी काही आश्वासने दिली. प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीला सरकारी नोकरी, जिविका दिदींना कायमस्वरूपी नोकरी आणि महिना तीस हजार रुपए पगार ही तेजस्वी यादव यांनी दिलेली वारेमाप आश्वासने मतदारांच्या पचनी पडली नाहीत.

जागा वाटपाच्या बाबतीत राजद आणि कॉंग्रेस यांच्यातील चर्चेचे गुऱ्हाळ शेवटच्या दिवसापर्यंत सुरू राहिल्याने, महाआघाडीमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आणि त्याचा फटका महाआघाडीला निवडणुकीत बसला. काही ठिकाणी महाआघाडीतील घटक पक्षांचे उमेदवार एकमेकांविरुद्ध उभे राहिल्याने,त्याचा फायदा रालोआला मिळाला.

तेजस्वी यादव यांना महाआघाडीचे मुख्यमंत्री पदाचे उमेदवार म्हणून घोषित करण्यास, कॉंग्रेसने विलंब लावल्याने, महाआघाडीला निवडणुकीत त्याचा फटका बसला. २०२० साली झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत महाआघाडीला, रालोआपेक्षा केवळ ११९५० मते कमी मिळाली होती.

या पार्श्वभूमीवर या खेपेची निवडणुक अतिशय चुरशीची होणार अशी शक्यता दिसून येत होती. या खेपेस राजदला जरी केवळ २५ जागांवर विजय मिळाला असला तरी, पक्षाच्या मतांची टक्केवारी गेल्या खेपेइतकीच म्हणजे २३ टक्के इतकी आहे.

ही टक्केवारी भाजपा आणि संयुक्त जनता दल यांना मिळालेल्या मतांच्या टक्केवारीपेक्षा थोडीशी जास्त आहे. याचाच अर्थ बिहार मधील मतदारांनी राजदला पूर्णपणे नाकारलेले नाही आणि ही गोष्ट तेजस्वी यादव यांना दिलासा देणारी आहे. भाजपा आणि संयुक्त जनता दल यांनी प्रत्येकी १०१ जागा लढवल्या होत्या,त र राजदने १४४ जागा लढवल्या होत्या, त्यामुळे राजदच्या मतांची टक्केवारी,भाजपा आणि संयुक्त जनता दल यांच्यापेक्षा जास्त असणे स्वाभाविक आहे.

राजदला नेहमी विजय मिळवून देणाऱ्या मुस्लिम - यादव समिकरणाने या खेपेस राजदला धोका दिल्याचे निवडणुक निकालाच्या विश्लेषणावरून दिसून आले आहे.

बिहारमधील सीमांचल हा विभाग राजदचा बालेकिल्ला मानला जातो. या विभागातील कटिहार, अररिया, पुर्णिया आणि किशनगंज हे जिल्हे मुस्लिम बहुल आहेत. तेथे यापुर्वी नेहमी राजदची चांगली कामगिरी झाली आहे. परंतु गेल्या खेपेला या विभागातील विधानसभेच्या ५ जागा जिंकून ओवेसींच्या ऑल इंडिया मजलिसे इत्तेहादूल मुस्लिमीन या पक्षाने धोक्याची घंटा वाजवली होती, परंतु तेजस्वी यादव यांनी त्याची दखल घेतली नव्हती.

निवडणुकीच्या अगोदर ओवेसी यांनी आपल्या पक्षाला महाआघाडीमध्ये सामावून घेण्याची विनंती तेजस्वी यादव यांना केली होती परंतु तेजस्वी यादव यांनी त्यांना धुडकावून लावले होते.त्याची फार मोठी किंमत निवडणुकीत, राजद आणि कॉंग्रेस यांना मोजावी लागली. सीमांचल विभागातील विधानसभेच्या गेल्या खेपेइतक्याच म्हणजे ५ जागा जिंकून, ओवेसी यांनी आपली ताकद पुन्हा एकदा दाखवून दिली. त्याशिवाय मुस्लिम मतांमध्ये विभाजन घडवून, ओवेसींच्या पक्षाने महाआघाडीचे काही उमेदवार पाडण्याचे काम चोखपणे बजावले.

लालूप्रसाद यादव हे जेव्हा बिहारचे मुख्यमंत्री होते तेव्हा त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कारकीदीर्तील जंगलराजची चर्चा आजही बिहारमध्ये होत असते.त्यांच्या नेतृत्वाखालील सरकार जेंव्हा बिहारमध्ये सत्तेवर होते, तेंव्हा अपहरण, हत्या वगैरे गोष्टी नित्याच्या होऊन बसल्या होत्या. त्याची आठवण झाली की बिहारमध्ये अनेकांच्या अंगावर शहारे येतात.

लालुप्रसाद यादव यांची पंधरा वर्षांची राजवट २००५ मध्ये संपुष्टात आली. त्या गोष्टीला आता २० वर्षे झाल्यानंतरही, लालूप्रसाद यादव यांच्या कारकिदीर्तील जंगलराज बिहार मधील अनेक लोक अद्याप विसरलेले नाहीत. भाजपा आणि संयुक्त जनता दल हे राजदचे विरोधक प्रत्येक निवडणुकीत लालूंच्या जंगलराजची भीती, बिहार मधील जनतेला दाखवतात आणि राजदचे नुकसान करतात.

थोडक्यात,याखेपेच्या निवडणुकीतही जंगलराजचा फटका तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील राजदला बसलाच. रालोआसारखी अद्यावत निवडणुक यंत्रणा महाआघाडीकडे नव्हती, ही गोष्टही याबाबतीत लक्षात घ्यायला हवी. नरेंद्र मोदी आणि नितीशकुमार यांचा सामना करण्यात, तेजस्वी यादव आणि राहुल गांधी हे कमी पडले, ही गोष्ट याठिकाणी मान्य करावीच लागेल. तेजस्वी यादव यांच्या दृष्टीने दिलासा देणारी गोष्ट म्हणजे त्यांच्या पक्षाला मिळालेली मतांची टक्केवारी ही इतर पक्षांपेक्षा जास्त आहे, त्यामुळे त्यांनी निराश होण्याचे कोणतेही कारण नाही.

■ ■ ■

# राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व मनोहर जोशी

राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांची आज जयंती. अत्यंत गरीब कुटुंबात २ डिसेंबर १९३७ रोजी जन्मलेले मनोहर जोशी यांचा शिवसैनिक ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हा प्रवास थक्क करणारा आहे.

नगरसेवक, महापौर, आमदार, विरोधी पक्ष नेते, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री ते लोकसभेचे अध्यक्ष असा त्यांचा राजकीय प्रवास आहे. शिवसेनेची स्थापना १९६६ साली झाली आणि पुढच्याच वर्षी म्हणजे १९६७ साली मनोहर जोशींनी शिवसेनेत प्रवेश केला म्हणजे शिवसेनेच्या पहिल्या फळीचे ते नेते होते.

शिवसेनेच्या अनेक आंदोलनात त्यांनी हिरीरीने भाग घेतला होता. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे ते अत्यंत विश्वासू आणि निष्ठावंत साथीदार होते म्हणूनच १९९५ साली शिवसेना भाजप युतीचे सरकार सत्तेत आल्यावर बाळासाहेबांनी त्यांना थेट मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसवले.



१४ मार्च १९९५ ते ३१ जानेवारी १९९९ या काळात ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यानंतर त्यांना केंद्रात मंत्रीपद आणि लोकसभेचे अध्यक्षपदही मिळाले. १९९९ ते २००२ या याकाळात ते अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय मंत्री होते तर २००२ ते २००४ या काळात ते लोकसभेचे अध्यक्ष होते.

महाराष्ट्राच्या राजकारणात पाच दशकांहून अधिक काळ राहूनही त्यांचा कोणाशी वाद झाला नाही. त्यांच्या मितभाषी व प्रेमळ स्वभावाने त्यांनी सर्वांची मने जिंकली. विरोधी पक्षातही त्यांच्या विषयी आदराची भावना होती म्हणूनच त्यांना राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व असे म्हंटले जाते.

राजकारणा प्रमाणे व्यवसायातही त्यांनी यश मिळवले. कोहिनूर इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून महाराष्ट्रातील असंख्य तरुणांना प्रशिक्षित करून रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम त्यांनी केले. मनोहर जोशी यांनी काही पुस्तके लिहिली.

त्यांनी लिहिलेले शिवसेना काल - आज - उद्या हे पुस्तक म्हणजे शिवसेनेचे चरित्र लेखन आहे. मनोहर जोशी हे शिवसेनेच्या ५० वर्षाच्या चढ उताराचे साक्षीदार होते.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

१९६७ साली शिवसेनेत प्रवेश केलेले मनोहर जोशी अखेरच्या श्वासापर्यंत शिवसेनेशी एकनिष्ठ राहिले. शिवसेना हाच त्यांचा श्वास, शिवसेना हाच त्याचा प्राण आणि बाळासाहेब हेच त्यांचे एकमेव दैवत होते.

बाळासाहेब त्यांना पंत म्हणून संबोधत. मागील वर्षी २३ फेब्रुवारी २०२४ रोजी वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने बाळासाहेबांच्या मुशीत तयार झालेला एक कट्टर शिवसैनिक काळाच्या पडद्याआड गेला. राजकारणात असूनही सर्वांशी मैत्रीचे संबंध असणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व मनोहर जोशी यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

■ ■ ■

# शेतकऱ्यांचे आकडे बोलत आहेत, पण शासन बहिरं झालंय!

आज देशात प्रत्येक विषयावर चर्चा होते .सिनेमे, राजकारण, क्रीडा, निवडणुका, सत्ता, आकडे. पण ज्या अन्नदात्याच्या श्रमावर हा देश जगतो, त्याच्या जिवाच्या आकड्यांकडे मात्र शासन, मंत्री, अधिकारी, अर्थतज्ञ सगळेच जाणून-बुजून डोळे झाकतात! आणि त्याच अन्नदात्याचा हिशोब आज तुमच्या समोर मांडला. सोयाबीनची एकच बॅग काढून शिकवलेलं सत्य सरकारसाठी थेट चपराक आहे! सोयाबीनचा एका बॅगचा हिशोब. शासनाच्या अपयशाचा जाहीरनामा!

नागरणी - 1500
पंजी - 600
पट्टा पाल - 600
पेरणी - 600
बियाणे - 3000
भाडं व हमाली - 100
तननाशक - 1000
फवारणी - 500
डवरणी - 1000
निंदण - 2000
पहिली फवारणी - 1500
दुसरी फवारणी - 1500
युरिया - 300
काढणी - 1200
घरी आणणे - 250
हमाली - 200
बारदाना - 400
मार्केटला नेणे - 600
हमाली - 100
ताडपत्री - 1000
पेट्रोल - 500
इतर खर्च - 550
एकूण खर्च : 23,550
आणि उत्पन्न?
5 क्विंटल
भाव 4000
उत्पन्न = फक्त 20,000 रुपये!
थेट तोटा : 3,550 रुपये!

हा फक्त तोटा नाही. ही अन्नदात्याच्या अस्तित्वाची घोषणा आहे! हा तोटा आकड्यात दिसतो. पण शेतकऱ्याच्या घरात तोटा असा दिसतो. मुलांचा स्कूल फी भरता येत नाही. कुटुंबाच्या औषधांना पैसे नाही. दिवाळीत घरात दिवा लावायला पैसाही नाही. कर्जाचा व्याज दर महिन्याला आत्मा पोखरतो, साहुकार घरासमोर उभा असतो, बँका फोन करून धमकी देतात आणि सरकार घोषणांची फुले उधळत बसते! याला अन्न सुरक्षा म्हणायचं की शेतकऱ्याचा अन्नद्रोह?

जेव्हा पेट्रोल-डिझेल वाढते, तेव्हा सरकार म्हणतं आंतरराष्ट्रीय परिस्थिती. जेव्हा खतांचे दर वाढतात, तेव्हा म्हणतात उत्पादन खर्च वाढला.जेव्हा औषधांचे भाव दुप्पट होतात,तेव्हा म्हणतात कंपन्यांचा तुटवडा. पण जेव्हा शेतकऱ्याच्या उत्पादनाचे भाव वाढवायचे असतात, तेव्हा सरकारला अचानक महागाई आठवते, अर्थव्यवस्था आठवते, अन्न सुरक्षा आठवते! पण अन्नदाता आठवत नाही!

शेतकऱ्याला भाव द्यायचा नाही? मग हे तरी मोफत द्या! शेतकरी सांगतोय–जर बाजारभाव देणार नसाल तर मग किमान–बियाणे मोफत द्या, खत मोफत द्या, औषधे मोफत द्या, सिंचनासाठी वीज मोफत द्या, शेतकऱ्यांच्या मुलांचे शिक्षण मोफत करा, शेतीवरच्या कामाला रोजगार हमीचा दर्जा द्या व त्याची मजुरी सरकारने द्यावी. कुटुंबाचे आरोग्य मोफत करा! त्याच्या मुला मुलीचे लग्नाचा खर्च शासनाने करावा. शेतकऱ्याला काढणीला 4 महिने लागतात, पण त्याला मिळते फक्त तोटा.



गजानन हरणे
समाजसेवक
खडकी, अकोला.
9822942623

पूर्वार्ध

कृषी मंत्री, मुख्यमंत्री मूकदर्शक राहू नका! हा हिशोब तुमच्या टेबलावरच पोहोचणार! हे फक्त शेतकऱ्याचे गणित नाही. हे सरकारचे अपयश आहे. हा शेतकऱ्याचा बिल नाही. ही शासनाच्या निष्क्रियतेची पावती आहे. कृषी विभाग, विपणन विभाग, अर्थ विभाग, प्रशासकीय यंत्रणा सगळेच पळवाट काढतात.

शेतकरी विचारतो "काय माझं जगणं एवढंच स्वस्त? माझा घाम एवढा स्वस्त? माझी पिकं एवढी स्वस्त?" शेतकरी मरतोय आणि सरकारच्या फाईल्समध्ये "परिस्थिती नियंत्रणात" असतं!

शेतकरी आत्महत्या करतो अधिकारी लिहितात व्यक्तिगत कारणांमुळे. शेतकरी दिवाळखोर होतो. सरकार सांगतं. स्थिती सुधारली आहे. शेतकरी आंदोलन करतो. सरकार म्हणतं काही तत्वांनी भडकवलंय. शेतकरी भाव मागतो सरकार म्हणतं महागाई वाढेल. शेतकरी जिव (आत्महत्या) देतो. पण सरकारला आकडे वाचायला वेळ नाही!

हा देश केवळ उद्योगांनी नाही. शेतकऱ्याच्या घामाने चालतो! आज शेतकरी संपला तर कारखाने थांबतील, हॉटेल बंद होतील, शहरं उपाशी राहतील उद्योगांची चाके थांबतील, अर्थव्यवस्था जमिनीवर येईल, पण सरकारने एक दिवस देखील विचार केला का? शेतकरी वाचला तरच भारत जगेल!

---------------

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

■ ■ ■

# अमली पदार्थ मुक्त भारत

वाचक लिहितात

मणिपूरमध्ये आसाम रायफल नी टेन्गनौपाल जिल्ह्यातील 15 एकर बेकायदेशीर अफूची शेती नष्ट केली, त्यासाठी केलेली तात्पुरती सिंचन व्यवस्था हटवली,तसेच रासायनिक फवारे पंप, शेतीचे साधने, तणनाशकेही नष्ट केली गेली. आत्तापर्यंतच्या या मोहिमेत हजारो एकराहून अधिक असलेल्या अफूच्या शेतीचा नाश करण्यात आला आहे.

अफू आंतरराष्ट्रीय बाजारात एक ते दीड लाख रुपये किलो या दराने विकली जाते त्यामुळे अशा शेतीला अधिकाधिक मागणी आहे. मणिपुर सारख्या डोंगराळ भागांमध्ये अफूची शेती करण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. अफूच्या शेतीतून मिळणाऱ्या कोट्यवधी रुपयांचा माध्यमातून गुन्हेगारी पोसली जाते.

मणिपूरला अशांत, हिंसक आणि अस्थिर करायचे आणि त्याला त्याच स्थितीत ठेवायचे मूळ अफू सारख्या अमली पदार्थाच्या शेतीत आहे. अशा शेतीतून निर्माण झालेला माल म्यानामार, चीन, अफगाणिस्तान, पाकिस्तान या देशात मोठ्या प्रमाणात पाठवला जातो.

अमली पदार्थांच्या व्यापारातून मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असते तसेच त्यामधून शासनाला मोठ्या प्रमाणात महसूल मिळत असतो. करोनाच्या काळात सर्व व्यवसाय बंद झाल्यावर मद्य विक्रीतून राज्याला मोठया प्रमाणात राजस्व मिळाला होता आणि अजूनही तो मिळत असल्यामुळे त्या व्यवसायला अधिकाधिक प्रोत्साहन दिले जाते. पुढच्या महिन्यात मुंबई येथे सनबर्न फेस्टिवल आहे.

आशियातील सर्वात मोठा इलेक्ट्रिकल म्युझिकल डान्स अशी वरवर ओळख असणाऱ्या पण मोठया प्रमाणात अमली पदार्थांचे सेवन आणि अश्लीलता असणारा हा महोत्सव आहे. दोन ते तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवामुळे 200 ते 300 कोटी रुपयांपर्यंतचा महसूल मिळतो. अंमली पदार्थ सेवनाचे लोण आता शाळा महाविद्यालयांपर्यंत पोहोचले आहे त्यामुळे लहान, तरुण मुले, मुली ह्याच्या आहारी गेले आहे आणि याचा फायदा घेत सनबर्न फेस्टिवल सारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

मोठया प्रमाणात मिळणाऱ्या महसूलामुळे शासन ह्याला अनुमती देते. संपूर्ण देशाला पयार्याने सरकारी यंत्रणेला पोखरण्याचे सामर्थ्य या अमली पदार्थाच्या तस्करीत दडलेले आहे. केंद्र आणि राज्य सरकारने अमली पदार्थ मुक्त भारत हे स्वप्न साध्य करण्यासाठी तत्परतेने पावले उचलणे आवश्यक आहे.

तसेच प्रत्येक नागरिकांनी अशा पदार्थाच्या सेवनाने होणाऱ्या गंभीर परिणामांची जाणीव आपल्या मुलांना देऊन त्यांना यापासून परावृत्त केले पाहिजे. सकस आहार, चांगले आचरण आणि सकारात्मक विचार देणारी आपली परंपरा,संस्कृती आहे आणि त्याबद्दल आपल्या मुलांना सांगणे, धर्म शिक्षण देणे गरजेचे आहे. स्वतःला, समाजाला आणि देशाला सार्वभौम स्थितीत आणायचे असल्यास हे करणे गरजेचे आहे.

■ लीना मकरंद गाडगीळ, पनवेल.

# हिवाळ्यात कोणती फळे खाऊ नयेत?



**कलिंगड** : कलिंगड शरीराला थंडावा देते, म्हणून हिवाळ्यात ते खाल्ल्याने सर्दी किंवा घसा खवखव वाढू शकते. त्यात जास्त पाण्याचे प्रमाण थंड हवामानात शरीराचे तापमान कमी करते.

**खरबूज** : खरबूज देखील शरीराला थंडावा देणारं फळ आहे. हिवाळ्यात जेव्हा पचनशक्ती कमकुवत असते तेव्हा हे फळ पचण्यास कठीण होऊ शकते. ते श्लेष्मा वाढवते, ज्यामुळे सर्दी देकील होऊ शकते.

**अननस** : अननस हे संवेदनशील फळ आहे. हिवाळ्यात जास्त प्रमाणात हे फळ खाल्ले तर घसा खवखवणे, तोंड येणे किंवा ॲलर्जी अशा समस्या निर्माण होऊ शकतात. हिवाळ्यात त्याचे जास्त सेवन केल्याने रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम होऊ शकतो

**केळी** : थंड हवामानात केळीमुळे श्लेष्मा वाढू शकतो आणि सकाळी केळी खाल्ल्यानंतर अनेकांना जडपणा जाणवतो. हिवाळ्यात त्यांचे सेवन मर्यादित करणे चांगले.

**द्राक्षे** : द्राक्षे शरीराला थंडावा देतात आणि अनेकदा खोकला आणि सर्दी होऊ शकतात. त्यांच्यातील साखरेचे प्रमाण जास्त असल्याने हिवाळ्यात जास्त प्रमाणात सेवन करणे नुकसानकारक ठरू शकते.

**हिवाळ्यात कोणती फळे खावीत?**
हिवाळ्यात सफरचंद, संत्री, पेरू, डाळिंब आणि किवी यांसारखी फळे खावीत. ही फळे रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात, व्हिटॅमिन सी समृद्ध असतात आणि शरीराला आतून उबदारपणा आणि ऊर्जा प्रदान करतात.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

## परिपक्व लोकशाही

**भारतात लोकशाही प्रणाली**
**तर घराणेशाहींच काय काम**
**मतदारांनो एकदा द्या निवडून**
**दुसऱ्या टर्मला जय श्रीराम..**

**नवे विचार कल्पक योजना**
**साकारण्या द्या इतरांना संधी**
**परिवर्तन असे सृष्टीचा नियम**
**आपण समजून घेणार कधी?**

**गुलाम म्हणून जगण्याचे**
**लागले असतील डोहाळे**
**तर खुशाल डोळे झाकून**
**मतदान करा गडे...!**

## शिवरायांच्या डोक्यात घातली भाजपची टोपी आणि गळ्यात कमळाचा गमछा

# भाजप उमेदवाराकडून छत्रपतींचा अवमान

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. १ :

शहरातील भाजपच्या एका महिला उमेदवाराने संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या डोक्यावर भाजपची टोपी व गळ्यात कमळाचा गमच्छा टाकल्याचा संतापजनक प्रकार केला आहे.

यासंबंधीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी या प्रकरणी भाजपवर शरसंधान साधले आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे आमच्याच पक्षात आहेत, हे दाखवण्याचा हा भाजप उमेदवाराचा केविलवाणा प्रकार आहे, असे त्या म्हणाल्या.

भंडारा शहरातील भाजपच्या एका महिला उमेदवाराने चक्क छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला भाजपची टोपी व कमळाचा गमच्छा घातल्यामुळे एकच खळबळ माजली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज हे आमच्याच पक्षात आहेत हे सांगण्याचा बालिश प्रयत्न करत भाजप महिला पदाधिकाऱ्यांकडून हुल्लडबाजी झाली. भंडारा शहरातील प्रभाग 2 मधील भाजपा उमेदवारांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गळ्यात पक्षाचा गमजा व डोक्यावर टोपी घातली. ही कृती निषेध व संतापाच्या पलीकडील आहे, असे सुषमा अंधारे या प्रकरणी आपला संताप व्यक्त करताना म्हणाल्या.

**भाजप हा महाराष्ट्र द्रोही**
**वर्षा गायकवाडांची टीका**

काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनीही या प्रकरणी भाजपवर निशाणा साधला आहे. भाजप महाराष्ट्र द्रोही आहे! महाराष्ट्राच्या दैवतांचा अपमान भाजप नेते वारंवार करतात आता तर निवडणुकीच्या प्रचारात थेट छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला भाजप पक्षाची टोपी आणि दुपट्टा घातला! ज्या महाराष्ट्रावर छत्रपती शिवाजी महाराज आज ही अधिराज्य करतात त्या महाराजांच्या गळ्यात पक्षाचा दुपट्टा घालण्याची हिंमत भाजप नेते करूच कसे शकतात? लाजा सोडल्यात भाजपवाल्यांनी! छत्रपती शिवाजी महाराजांचं नाव घेऊन राजकारण करताना विसरले नेते महाराष्ट्राचे दैवत तुमच्या पक्षाचे कार्यकर्ते नाहीत, असे वर्षा गायकवाड यांनी म्हटले आहे.



काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मोहन पंचभाई यांनी या प्रकरणी तीव्र संताप व्यक्त केला आहे. भाजपकडून सातत्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान होत असतो. मोदींनीही महाराजांचा जिरेटोप घालून त्यांचा अवमान केला होता. भाजपकडून वारंवार अशा पद्धतीची कृत्य होत असतात. पण अशा उन्मादी प्रवृत्तीवर कोणतीही कारवाई केली जात नाही. यामुळे त्यांची हिंमत वाढली आहे, असे ते म्हणालेत. ओबीसी क्रांती मोचार्नेही या प्रकरणी योग्य ती कारवाई करण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे केली आहे.

भाजपच्या महिला उमेदवाराने त्यांच्या गळ्यात कमळाचा गमच्छा अर्थात रुमाल घातला. त्या एवढ्यावरच थांबल्या नाहीत. त्यानंतर त्यांनी भाजपची टोपीही छत्रपतींच्या जिरेटोपावर घातला. यामुळे तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## आयोगाचा गोंधळ की काहीतरी वेगळं?

### हर्षवर्धन सपकाळांचा स्फोटक सवाल!

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :

राज्यातील स्थानिक स्वराज्याच्या १० वर्षांनंतर होणाऱ्या निवडणुकांना अक्षरशः अंतिम टप्प्यात गोंधळाचा धक्का बसला आहे.



मतदानाच्या अवघ्या एक दिवस आधी २० नगरपालिका आणि काही प्रभागांतील निवडणुका स्थगित करण्याच्या निर्णयाने राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. यावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज प्रचंड संताप व्यक्त करत निवडणूक आयोगालाच धारेवर धरले.

त्यांनी थेट हल्ला चढवला, कोर्टाचा निकाल २२ नोव्हेंबरला आला मग ३० नोव्हेंबरपर्यंत आयोग काय झोपा काढत होता काय? स्वतःचे नियम पाळता येत नसतील तर हा कसला आयोग? निवडणुका जाहीर केल्या आणि मग अचानक आरक्षण, याद्या, प्रभाग– सगळ्यात गोंधळ! काही वर्षांपासून निवडणूक आयोगाला निवडणुकाही निभवता येत नाहीत!

सपकाळ यांनी प्रशासनाच्या कारभारातील त्रुटी एक-एक करत उघड केल्या.

अर्ज प्रक्रिया किचकट, मतदार याद्यांतील दुबार-तिबार नावे, जाहीर झालेल्या निवडणुकांनंतरच कोर्टाची नोंद आणि आता मतदानाच्या उंबरठ्यावर स्थगितचा बॉम्ब!

यासोबतच त्यांनी ३ डिसेंबरला होणाऱ्या निकालावरही प्रश्नचिन्ह उभं करत ठाम मागणी केली की,या निकालाचा मतदानावर परिणाम होऊ शकतो; म्हणून तो २० तारखेच्या मतदानानंतरच जाहीर करा!

नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी दिल्ली गुन्हे शाखेने सोनिया गांधी, राहुल गांधी आणि वरिष्ठ काँग्रेस नेत्यांवर दाखल केलेल्या गुन्ह्यांवर सपकाळ यांनी जोरदार प्रहार केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, मोदी-शाह सरकार फक्त विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी सरकारी यंत्रणांचा वापर करत आहे. हेरॉल्ड प्रकरणात इतक्या चौकशा करूनही काहीच मिळालं नाही, तरी राजकीय सूडासाठी गांधी कुटुंबाला टार्गेट केलं जातंय. गांधी घराण्याचा त्याग, बलिदान, योगदान अमूल्य आहे म्हणूनच त्यांना त्रास देण्याचा हा खेळ सुरू आहे.

मोदी-शाहांना गांधी कुटुंब दिसतं; पण मोहोळ-अजित पवार यांचा जमीन घोटाळा दिसत नाही? राष्ट्रीय नेत्यांवर गुन्हे दाखल करताना इतका उत्साह पण कोट्यवधींच्या पुणे जमीन घोटाळ्याप्रकरणी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार यांच्यावर कारवाई कुठे आहे? सरकार एवढं सिलेक्टिव्ह का?

त्यांनी मोदी-शाह यांच्या सुडाच्या राजकारणाचा तीव्र निषेध नोंदवताना सांगितले की काँग्रेस अशा दबावाला कधीही झुकणार नाही.

## अमरावतीत दिल्लीसारख्या बॉम्बस्फोटाची धमकी, माथेफिरू अखेर इंदूरमध्ये जेरबंद

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १ :

अमरावती पोलीस आयुक्तालय परिसरात बॉम्बस्फोट करण्याची धमकी देणारा अखेर २४ तासांच्या आत इंदूरमध्ये पकडला गेला. हरीश पांडुरंग घाडवे ऊर्फ सोहेल पांडुरंग शेख (३३, रा. रहाटगाव, अमरावती) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

अमरावती शहर पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला फोन करून बॉम्बस्फोट घडवून आणण्याची धमकी दिल्याची कबुली त्याने दिली. आपण ते कृत्य नशेत केल्याचे त्याने पोलिसांना सांगितले.

शहर पोलीस आयुक्तालयातील नियंत्रण कक्षाच्या लँडलाइन व एका मोबाइल क्रमांकावर २८ नोव्हेंबरला रात्री अज्ञात कॉल आला. आपण कन्व्हर्टेड मुस्लीम आहोत, असे सांगत त्याने आपली ओळख हरीश अशी करून दिली होती. अखेर पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या.

## असा निवडणूक आयोग कधीच पाहिला नाही

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १ :



महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अचानक निर्माण झालेल्या गोंधळावरून राज्यातील राजकारण तापले आहे. अनेक नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवड प्रक्रिया मतदानाच्या केवळ एक दिवस आधीच पुढे ढकलण्यात आल्या, त्यामुळे उमेदवार आणि मतदारांमध्ये संभ्रम वाढला आहे. या पार्श्वभूमीवर संगमनेर येथे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी निवडणूक आयोगावर टीका केली.

माझ्या राजकीय प्रवासात असा गोंधळलेला आणि दबावाखाली काम करणारा निवडणूक आयोग मी कधीच पाहिला नाही, अशा शब्दांत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांच्या म्हणण्यानुसार, पूर्वीचे निवडणूक आयोग स्वायत्तपणे काम करायचे, परंतु आता आयोग सरकारच्या दिशेनुसार निर्णय घेत असल्याचे चित्र आहे. निवडणुका एक दिवस आधी पुढे ढकलणे, काही ठिकाणी प्रक्रिया थांबवणे, तर काही ठिकाणी जुन्या याद्यांवरून मतदानाची तयारी ठेवणे, या कृतींमुळे लोकांचा आयोगावरचा विश्वास ढासळत असल्याची टीका त्यांनी केली.

थोरात यांनी यावेळी सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाबाबत दिलेल्या स्पष्ट आदेशांकडे आयोग दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला. न्यायालयाने आरक्षणाचा प्रश्न सुटल्याशिवाय निवडणुकांबाबत निर्णय घेऊ नये, असे आदेश पूर्वी दिले होते. तरीही कार्यक्रम आखताना सर्व घटकांचा विचार न केल्याने हा गोंधळ निर्माण झाल्याचे ते म्हणाले.

## रोहित्र आणि कृषीपंपालाही ऑटोस्विच मारक

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १ :

रबी हंगामाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे शेतीसाठी वीज वापर वाढलाय. महावितरणही या काळात सुरळीत वीज पुरवठा करण्यास सज्ज आहे ,परंतू शेतकऱ्यांनी कृषीपंपासाठी ऑटोस्विचचा वापर टाळावा आणि कपॅसिटर बसवावा असे आवाहन महावितरण अकोला परिमंडळच्या वतीने करण्यात आले आहे.

कृषिपंप तत्काळ सुरू करण्याच्या उद्देशाने ग्राहक ऑटोस्विच बसवतात. त्यामुळे परिसरातील सर्व कृषिपंप एकाच वेळी सुरू होऊन रोहित्रावरील भार अचानक वाढतो. परिणामी रोहित्र जळणे, वीजवाहिन्या बंद वा नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढते. यातून होणारी गैरसोय व नुकसान टळावे तसेच सुरळीत व योग्य दाबाचा वीजपुरवठा मिळावा, यासाठी शेतकऱ्यांनी कृषिपंपांना ऑटोस्विचऐवजी कॅपॅसिटर बसवून घेणे गरजेचे आहे.

कपॅसिटर बसविण्याचे अनेक फायदे

प्रत्येक कृषिपंपास क्षमतेनुसार कॅपॅसिटर बसवणे हा रोहित्र जळणे वा नादुरुस्त होण्याचे प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी एक सोपा उपाय आहे. कॅपॅसिटरमुळे कमी दाबाचा वीजपुरवठा, रोहित्र जळाल्यास वा नादुरुस्त झाल्यास दुरुस्ती कालावधीतील खंडित वीजपुरवठा या समस्या सुटण्यास मदत होणार आहे.

मात्र बहुतांश ग्राहकांनी कृषिपंपांना कॅपॅसिटर बसविलेले नाहीत. बसविलेल्यांपैकी काहींचे बंद तर काहींनी थेट जोडणी केली असल्याने ज्यांनी कॅपॅसिटर बसविले नाहीत त्यांनी ते बसवून घ्यावेत आणि कॅपॅसिटर बंद किंवा थेट जोडणी असल्यास ते दुरुस्त करून घ्यावेत, असे आवाहनही महावितरणतर्फे करण्यात आले आहे. कृषी क्षेत्रातील कार्यक्षम ऊर्जा वापरात कॅपॅसिटर हे उपकरण महत्त्वाचे आहे.

कृषिपंपास कॅपॅसिटर बसवल्यामुळे विद्युत केबल जळण्याचे प्रमाण कमी होते. योग्य विद्युतदाब, केव्हीए मागणी, वीज वापरात बचत आदी फायदे होतात. कृषिपंपांना दिवसा व रात्री अशा चक्राकार पद्धतीने वीजपुरवठा करण्यात येतो.

## दंत रोपण शस्त्रक्रिया आणि प्रक्रिया

लोकारोग्य



दंत रोपण शस्त्रक्रिया म्हणजे नक्की काय? त्याची प्रक्रिया कशी असते? आणि या शस्त्रक्रियेचे फायदे काय असतात? याबद्दल सुप्रसिध्द दंतविकार तज्ञ डॉ. ली चेन यांच्याशी बातचीत

**दंतरोपण शस्त्रक्रिया म्हणजे काय?**

■ डेंटल इम्प्लांट सर्जरी ही एक अत्याधुनिक दंत प्रक्रिया आहे जी हरवलेले दात कृत्रिम मुळांनी बदलण्यासाठी डिझाइन केलेली आहे जी स्थिर किंवा काढता येण्याजोग्या बदललेल्या दातांसाठी एक स्थिर पाया प्रदान करते.

डेंटल इम्प्लांट सर्जरीचा प्राथमिक उद्देश रुग्णाच्या हास्याचे कार्य आणि सौंदर्यशास्त्र दोन्ही पुनर्संचयित करणे आहे, ज्यामुळे व्यक्तींना आत्मविश्वासाने खायला, बोलण्यास आणि हसण्यास अनुमती मिळते. ही प्रक्रिया विशेषतः दुखापत, पीरियडोंटल रोग किंवा इतर दंत समस्यांमुळे दात गमावलेल्यांसाठी फायदेशीर आहे.

डेंटल इम्प्लांट शस्त्रक्रियेदरम्यान, जबड्याच्या हाडात एक टायटॅनियम पोस्ट शस्त्रक्रियेने ठेवली जाते, जी हरवलेल्या दाताच्या बदली मुळा म्हणून काम करते. कालांतराने, हाड इम्प्लांटशी जोडले जाते ज्याला ऑसिओइंटिग्रेशन म्हणतात, ज्यामुळे कृत्रिम दातासाठी एक मजबूत आणि टिकाऊ आधार तयार होतो. एकदा इम्प्लांट हाडाशी एकरूप झाला की, एक मुकुट, पूल किंवा डेन्चर जोडता येतो, ज्यामुळे पुनर्संचयित प्रक्रिया पूर्ण होते.दंत रोपण शस्त्रक्रिया ही केवळ सौंदर्यशास्त्राबद्दल नाही तर ती तोंडाचे आरोग्य राखण्यात देखील महत्त्वाची भूमिका बजावते.

**दंतरोपण शस्त्रक्रिया का केली जाते?**

■ ज्या व्यक्तींनी एक किंवा अधिक दात गमावले आहेत आणि त्यांचे हास्य आणि तोंडाचे कार्य पुनर्संचयित करण्यासाठी दीर्घकालीन उपाय शोधत आहेत त्यांच्यासाठी डेंटल इम्प्लांट शस्त्रक्रिया सामान्यतः शिफारसित केली जाते. अनेक परिस्थिती आणि लक्षणे या प्रक्रियेची शिफारस करू शकतातः

डेंटल इम्प्लांट सर्जरीचे सर्वात स्पष्ट कारण म्हणजे एक किंवा अधिक दात नसणे. हे आघात, किडणे किंवा हिरड्यांचे आजार यासारख्या विविध कारणांमुळे होऊ शकतेदात नसल्याने अन्न व्यवस्थित चावणे किंवा स्पष्ट बोलणे कठीण होऊ शकते. डेंटल इम्प्लांट विविध आहार घेण्याची आणि प्रभावीपणे संवाद साधण्याची क्षमता पुनर्संचयित करू शकतात. जेव्हा दात गळतात तेव्हा जबड्याचे हाड आकुंचन पावू लागते.

डेंटल इम्प्लांट्स हाडांना उत्तेजित करतात, ज्यामुळे त्याची घनता आणि रचना टिकून राहण्यास मदत होते.गंभीर हिरड्यांच्या आजारामुळे दात गळू शकतात. जर आजारावर उपचार केले गेले आणि रुग्ण निरोगी असेल तर दंत रोपण हा एक योग्य पर्याय असू शकतो.

**दंतरोपण शस्त्रक्रिएचे प्रकार किती आहेत?**

दंत इम्प्लांट शस्त्रक्रियेसाठी विविध तंत्रे आणि दृष्टिकोन असले तरी, प्राथमिक प्रकारांचे वर्गीकरण इम्प्लांटची संख्या आणि वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट तंत्रांवर आधारित केले जाऊ शकते. येथे सर्वात ओळखले जाणारे प्रकार आहेतः

**एंडोस्टील इम्प्लांट्सः** हा दंत रोपणाचा सर्वात सामान्य प्रकार आहे. एंडोस्टीयल इम्प्लांट थेट जबड्याच्या हाडात बसवले जातात आणि एक किंवा अधिक कृत्रिम दातांना आधार देऊ शकतात. ते सामान्यतः टायटॅनियमपासून बनलेले असतात आणि लहान स्क्रूसारखे आकाराचे असतात.

सबपेरियोस्टील इम्प्लांट्स, हे इम्प्लांट हिरड्याखाली पण जबड्याच्या वर ठेवले जातात. ज्या रुग्णांचे जबड्याचे हाड पुरेसे निरोगी नाही आणि ज्यांना हाड वाढवण्याची प्रक्रिया करायची नाही त्यांच्यासाठी ते वापरले जातात. सबपेरिओस्टियल इम्प्लांट एंडोस्टियल इम्प्लांटपेक्षा कमी सामान्य आहेत.

**गोमेटिक रोपण :** या प्रकारचे इम्प्लांट वरच्या जबड्याऐवजी गालाच्या हाडात (झायगोमॅटिक हाड) टांगलेले असते. ज्या प्रकरणांमध्ये वरच्या जबड्यात हाडांचे लक्षणीय नुकसान होते, त्यामुळे पारंपारिक इम्प्लांट अशक्य होतात, अशा प्रकरणांमध्ये झायगोमॅटिक इम्प्लांट वापरले जातात.

**दंतरोपण शस्त्रक्रिएचे धोके**
**आणि गुंतागुंत काय असते?**

■ कोणत्याही शस्त्रक्रियेप्रमाणे, दंत रोपण शस्त्रक्रियेमध्ये काही धोके आणि संभाव्य गुंतागुंत असतात. बहुतेक रुग्णांना यशस्वी परिणाम मिळत असले तरी, या प्रक्रियेशी संबंधित सामान्य आणि दुर्मिळ दोन्ही जोखमींबद्दल जागरूक असणे आवश्यक आहे. सर्वात सामान्य जोखमींपैकी एक म्हणजे इम्प्लांट साइटवर संसर्ग. योग्य तोंडी स्वच्छता आणि शस्त्रक्रियेनंतरच्या काळजीच्या सूचनांचे पालन केल्याने हा धोका कमी होण्यास मदत होऊ शकते.रक्तस्त्रावः शस्त्रक्रियेनंतर काही प्रमाणात रक्तस्त्राव होणे सामान्य आहे, परंतु जास्त रक्तस्त्राव होऊ शकतो.

जर रुग्णांना जास्त रक्तस्त्राव होत असेल तर त्यांनी त्यांच्या दंतवैद्याशी संपर्क साधावा. सूज आणि अस्वस्थताः शस्त्रक्रियेनंतर सूज आणि अस्वस्थता ही सामान्यतः काही दिवसांत कमी होते आणि बर्फाच्या पॅक आणि वेदनाशामक औषधांनी त्यावर नियंत्रण मिळवता येते.काही प्रकरणांमध्ये, इम्प्लांट हाडाशी एकरूप होऊ शकत नाही, ज्यामुळे इम्प्लांट सैल होऊ शकतो किंवा तोटा होऊ शकतो.

■ ■ ■

## 'भारत फोर्ज'चे बाबा कल्याणी यांना 'इंडियन ऑफ द इयर' पुरस्कार

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १ :

भारत फोर्ज लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक बाबा कल्याणी यांना सीएनएन-न्यूज१८ तर्फे इंडियन ऑफ द इयर २०२५ इन बिझनेस हा देशातील अत्यंत मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. राष्ट्राच्या आर्थिक व सामरिक प्रवासात मूलभूत योगदान देणाऱ्या दूरदर्शी नेतृत्वाला हा पुरस्कार दिला जातो.

अभियांत्रिकी, उत्पादन आणि संरक्षण-नवोन्मेष या क्षेत्रांत बाबा कल्याणी यांनी दिलेल्या अतुलनीय योगदानाची या गौरवातून दखल घेण्यात आली आहे. कल्याणी यांच्या नेतृत्वाखाली भारत फोर्जने एका देशांतर्गत फोर्जिंग कंपनीपासून जागतिक स्तरावर मान्यता मिळवलेल्या प्रगत उत्पादन आणि संरक्षण-तंत्रज्ञान संस्थेत स्वतःचे रूपांतर केले आहे.



## मातानंद वेल्फेअर फाउंडेशनची रक्तदान मोहीम




ENTOD फार्मास्युटिकल्सने मातानंद वेल्फेअर फाउंडेशनच्या सहकार्याने, त्यांच्या नवी मुंबई येथील कॉर्पोरेट कार्यालयात त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी (एंटोडियन) लिक्विड लव्ह रक्तदान मोहीम आयोजित केली.हा उपक्रम ENTOD च्या समुदाय कल्याण, मानवतावादी मूल्ये आणि कर्मचारी- चालित आरोग्य सेवा कार्यक्रमांसाठी चालू असलेल्या वचनबद्धतेमध्ये एक अर्थपूर्ण पाऊल आहे.

सत्यसाई बाबा यांच्या ९८ व्या जयंतीनिमित्त ही मोहीम आयोजित करण्यात आली होती, ज्यांचे प्रेम, सेवा आणि करुणेचे शिक्षण जगभरातील लाखो लोकांना प्रेरणा देत आहे. या उपक्रमाबद्दल बोलताना, एठळडऊ फार्मास्युटिकल्सच्या संचालक श्रीमती अंजुला मसुरकर म्हणाल्याः ENTOD मध्ये, आमचा असा विश्वास आहे की खरी आरोग्यसेवा औषधांच्या पलीकडे जाते, त्यात करुणा, सेवा आणि जबाबदारी यांचा समावेश आहे. हा उपक्रम आमच्या विश्वासाचे प्रतिबिंबित करतो की आपल्यापैकी प्रत्येकाकडे आपल्या समुदायाला आधार देण्याची आणि उन्नती करण्याची गुरुकिल्ली आहे.

रक्तदान हे मूक शौर्याचे कृत्य आहे आणि आम्हाला आमच्या एन्टोडियन्सचा अभिमान आहे जे प्रामाणिकपणा आणि हृदयाने सहभागी होण्यासाठी पुढे आले. या मोहिमेत सर्व विभागांमधील एन्टोडियन्सचा उत्साही सहभाग दिसून आला, जे मानवतेसाठी परतफेड करण्याच्या, सेवा करण्याच्या आणि उभे राहण्याच्या सामायिक उद्देशाने एकत्रित होते. वाशी येथील प्रमाणित मुंबादेवी रक्तपेढीतील वैद्यकीय व्यावसायिकांनी सुरक्षितता आणि दात्यांच्या काळजीचे सर्वोच्च मानक सुनिश्चित केले. ■ ■

## आरोग्यवर्धक डाळिंब



लाल डाळिंब नक्कीच एक चवदार आणि आरोग्यदायी पदार्थ आहे! आपल्या सर्वांना हे फळ खायला आवडते, जे आपल्या आरोग्यासाठी बरेच फायदे देते.

तुमच्या शरीरासाठी डाळिंबाचे असे अनेक फायदे आहेत ज्यामुळे तुम्हाला हे फळ रोज खाण्याची इच्छा होईल. डाळिंबाच्या कडक त्वचेला तडे गेल्याने पौष्टिक चांगुलपणाचा माणिक-लाल खजिना दिसून येतो. त्या रसाळ बियांमध्ये भरपूर जीवनसत्त्वे, खनिजे, अँटिऑक्सिडंट्स आणि फायबर असतात जे जळजळांशी लढण्यास आणि आपल्या एकूण आरोग्यास चालना देण्यास मदत करतात.

संशोधनानुसार, दररोज डाळिंब खाण्याचे अनेक फायदे आहेत ज्यामुळे दीर्घकालीन आजार होण्याची शक्यता कमी होण्यास मदत होईल, कर्करोग, आणि बरेच हृदय रोग. त्याशिवाय, तुम्ही सहनशक्ती वाढवण्याची, स्नायूंची जलद पुनर्प्राप्ती, किडनी स्टोनपासून बचाव आणि उत्तम पचनसंस्था निर्माण करण्याची अपेक्षा देखील करू शकता! जेवणात त्यांचा तिखट रस किंवा कुरकुरीत बिया जोडल्याने तुमच्या शरीराचे नुकसान होण्यापासून संरक्षण होते, रोगाचा धोका कमी होतो आणि वजन कमी करण्याच्या डाळिंबाचे अनेक फायदे मिळतात.

डाळिंबात अँथोसायनिन्स, टॅनिन आणि प्युनिकलागिन सारख्या शक्तिशाली अँटिऑक्सिडंट्स असतात. हे घटक जळजळ कमी करण्यासाठी आणि दीर्घकालीन आरोग्य समस्या टाळण्यासाठी अँटिऑक्सिडंट्स म्हणून ओळखले जातात.

■ ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## नागरिकांचा निवडणुकीवर बहिष्कार




■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. १ :

नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या काही तास आधी शहरातील प्रभाग क्रमांक १५ मधील अनुमाई नगर परिसरात नागरिकांनी उभारलेल्या बहिष्काराच्या फलकामुळे राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे. नळाला पाणी नाही, तर मतदान नाही, अशी ठाम भूमिका घेत नागरिकांनी थेट मतदान प्रक्रियेलाच बहिष्कार जाहीर केला आहे. वषार्नुवर्षे प्रलंबित पाणीपुरवठा समस्येवर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, प्रशासनाला त्यांच्या जीवघेण्या वास्तवाची जाणीव करून दिली आहे.

अनुमाई नगरातील ले-आऊटला मंजुरी मिळून अनेक वर्षे लोटली असली तरी कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आजतागायत झालेली नाही. अमृत योजनेअंतर्गत सहा वर्षांपूर्वी घराघरात नळ आणि पाइपलाइन बसविण्यात आली, मात्र मुख्य वाहिनीला पाण्याच्या टाकीशी जोडण्यास नगरपरिषदेकडून केलेल्या दुर्लक्षामुळे काम अधांतरी राहिले. नळ आहेत, पाइप आहेत, पण त्यातून पाण्याचा थेंबही येत नाही अशी परिस्थिती नागरिकांनी उघड करून दाखवली.

परिसरात मोठमोठे फलक, पोस्टर लावून नागरिकांनी आपला रोष सार्वजनिक केला आहे. निवडणुकीच्या उंबरठ्यावर नागरिकांचा हा थेट बहिष्कार उमेदवारांसाठी मोठे आव्हान ठरत असून प्रशासनालाही धास्तावून सोडणारा आहे. आता नगर परिषद तात्काळ पुढाकार घेते का? याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## किरकोळ कारणावरून तरुणाची हत्या

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १ :

किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून भररस्त्यात तरुणावर चाकूने सपासप वार करून त्याची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना जिल्ह्यातील शेगाव-अकोट मार्गावर सोमवारी घडली. पोलिसांनी मुख्य आरोपीसह दोन जणांना ताब्यात घेतले. गौरव बायस्कार असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे.

गौरव बायस्कार या तरुणाला मोरे कुटुंबातील दोन जणांनी एकत्रित गाठले. किरकोळ कारणावरून झालेला वाद टोकाला गेला. या वादातून दोघांनी गौरव याच्यावर चाकूने सपासप वार करीत गंभीर स्वरूपात जखमी केले. अकोट-शेगाव रस्त्यावरील अंदुरा फाट्यावर भर दिवसा हा प्रकार घडला.

परिसरातील नागरिकांनी गंभीर जखमी झालेल्या गौरवला चारचाकी वाहनात टाकून अकोल्यातील सर्वोपचार रुग्णालयात आणले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला. या घटनेची माहिती मिळताच उरळ पोलीस ठाण्याचे ठाणेदार पंकज कांबळे व त्यांच्या सहकारी पोलिसांनीया प्रकरणात उरळ पोलिसांनी मुख्य आरोपी विजय मोरे याच्यासह दोन जणांना ताब्यात घेतले. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


